cmyk

## संपादकीय

### पक्षांतराला लगाम : लोकशाही शुचितेसाठी हिमाचलचा धाडसी निर्णय

भारतीय लोकशाहीच्या प्रवासात 'लोकप्रतिनिधी' ही संकल्पना केवळ एक घटनात्मक पद नाही, तर ती जनतेच्या आशा-आकांक्षांची आणि विश्वासाची जिवंत अभिव्यक्ती आहे. मतदार आपल्या प्रतिनिधीकडे केवळ विकासकामांची अपेक्षा ठेवत नाही, तर तो त्या व्यक्तीकडून राजकीय प्रामाणिकपणा, निष्ठा आणि मूल्याधिष्ठित वर्तनाची अपेक्षा करतो. परंतु, गेल्या काही वर्षांत 'आयाराम-गयाराम' संस्कृतीने या संकल्पनेलाच गालबोट लावले आहे.


दैनिक

www.epaper.rajyaloktantra.com

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष-६ | अंक-१९ | मंगळवार दि.०७ एप्रिल २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने-६ | किंमत ३ रूपये


## थोडक्यात...

### शारीरिक चाचणीला गैरहजर दुसरी संधी नाही-सुप्रीम कोर्ट

नवी दिल्ली: सरकारी नोकरी भरतीमध्ये नियमांचे पालन करणे महत्त्वाचे असते. एखादा उमेदवार पोलीस भरतीच्या शारीरिक चाचणीला गैरहजर राहिला, तर तो उमेदवार ही चाचणी पुन्हा घेण्याची मागणी करू शकत नाही. त्याने शारीरिक चाचणी पुढे ढकलण्यासाठी अर्ज केला असेल आणि त्यावर काहीच प्रतिसाद मिळाला नसेल, तरीही तो उमेदवार आम्हाला दुसरी संधी द्या असा दावा करू शकत नाही. सरकारी भरतीत नियम सर्वांसाठी सारखेच असतात, तिथे वैयक्तिक अडचणींना महत्त्व दिले जात नाही, असे स्पष्ट करत सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायमूर्ती दिपंकर दत्ता आणि न्यायमूर्ती सतीश चंद्र शर्मा यांच्या खंडपीठाने दिल्ली उच्च न्यायालयाचा निर्णय रद्दबातल ठरवला. दिल्ली पोलीस भरती प्रक्रियेच्या पहिल्या टप्प्यात संबंधित उमेदवार पात्र ठरला होता. त्याची शारीरिक चाचणी १४ जानेवारी २०२४ रोजी होणार होती. मात्र, ताप, सर्दी, खोकला आणि चक्कर येत असल्याचे कारण देत तो चाचणीला गैरहजर राहिला. त्यानंतर त्याने चाचणी पुढे ढकलण्यासाठी तीन विनंती अर्ज केल्याचा दावा केला होता. प्रशासकीय न्यायाधिकरणाने त्याला पुढील बॅचमध्ये सहभागी करून घेण्याचे आदेश दिले होते, ज्यावर उच्च न्यायालयानेही शिक्कामोर्तब केले होते.

### सावित्रीबाईच्या वेशात खा.वाघमारेंनी घेतली शपथ

दिल्ली: राज्यसभेत शपथविधीच्या वेळी एक अनोखा आणि लक्षवेधी प्रसंग पाहायला मिळाला. शिवसेना खासदार ज्योती वाघमारे यांनी सावित्रीबाई फुले यांच्या वेशात राज्यसभेची शपथ घेत सर्वांचे लक्ष वेधून घेतले. त्यांच्या या कृतीमुळे संसद भवनात जोरदार चर्चा सुरु आहे. महिला सक्षमीकरण आणि सामाजिक परिवर्तनाचा संदेश त्यांनी दिल्याचे दिसून आले. शपथविधीदरम्यान ज्योती वाघमारे यांनी बाळासाहेब ठाकरे आणि एकनाथ शिंदे यांचे नाव घेत शपथ घेण्याचा प्रयत्न केला. मात्र, नियमांनुसार शपथ घेण्याची पद्धत ठरलेली असल्यामुळे त्यांना मध्येच थांबवण्यात आले. त्यानंतर त्यांनी नियमांनुसार 'ईश्वर साक्ष' म्हणून पुन्हा शपथ पूर्ण केली. शपथ घेतल्यानंतर वाघमारे यांनी भावनिक प्रतिक्रिया व्यक्त केली. त्यांनी सांगितले की, देशाच्या सर्वोच्च सभागृहात शपथ घेतल्यानंतर मी भारतीय संविधानासमोर नतमस्तक आहे. आज माझे आई-वडील माझ्यासोबत आहेत, ही माझ्यासाठी अभिमानाची बाब आहे.

### नांदेड: आरोपीला गोळीबार करून पकडले

नांदेड: गेल्या तीन दिवसांपासून नांदेड शहर हादरले आहे. तीन दिवसांत पाच जणांची हत्या झाल्यामुळे नांदेड शहराचे बिहार होत आहे का, अशी प्रतिक्रिया सामान्य नागरिकांतून व्यक्त होत आहे. नागरिकांचा संताप लक्षात घेता पोलिस अधीक्षक अबिनाशकुमार यांनी गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक उदय खंडेराय यांना तात्काळ गुन्हेगारांना पकडा असे आदेश दिल्यानंतर सोमवारी दुपारी झरी परिसरात मुख्य आरोपी अंकुश गंदमवार याच्या पायावर गोळी झाडून त्याच्यासह अन्य दोघांना ताब्यात घेण्यात आले. अशी माहिती पोलिस निरीक्षक खंडेराय यांनी दिली. सोमवारी सकाळी भाजपचे माजी शहर युवा अध्यक्ष सोनू कल्याणकर यांचा श्रीनगर परिसरात मुख्य रस्त्यावर खून करण्यात आला. सदरील घटनेचे वृत्त वाऱ्यासारखे शहरात पसरले. सोशल मीडियामार्फत पोलिस विभागावर आरोप-प्रत्यारोप करण्यात आले. ही बाब पोलिस अधीक्षकांच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी तात्काळ स्थानिक गुन्हा शाखेचे पोलीस निरीक्षक उदय खंडेराय यांना आदेश दिल्यानंतर खंडेराय यांनी आपली टीम पूर्णत: कामाला लावली.

## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती,**

**बीड, दि.०६ एप्रिल २०२६**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: १२०.०० क्विंटल | २,००० | २,७०० | २,३६३ |
| ज्वारी/हायब्रिड: २४५.०० क्विंटल | १,९०० | ५,००० | ३,२६९ |
| मका/लोकल: ३.५० क्विंटल | १,५०० | १,५०० | १,५०० |
| तूर : १.५० क्विंटल | ७,४३० | ७,४३० | ७,४३० |
| उडीद : २.५० क्विंटल | ६,३५४ | ६,३५४ | ६,३५४ |
| बाजरी: ६१.०० क्विंटल | २,३२१ | २,७१८ | २,५४२ |
| मुग: २.०० क्विंटल | ७,८०० | ७,८०० | ७,८०० |
| सोयाबीन: १८.५० क्विंटल | ५,५०० | ५,५०० | ५,५०० |
| हरभरा: ६.५० क्विंटल | ३,२७१ | ५,२५१ | ४,६६७ |

# शेतकरी कर्जमाफी योजनेच्या प्रक्रियेनंतरच नवीन पीक कर्जाचे वितरण

पुणे । प्रतिनिधी

**यंदाच्या खरीप हंगामासाठी शेतकऱ्यांना नव्या पीक कर्जाच्या वाटपात विलंब होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. राज्य सरकारने जाहीर केलेल्या शेतकरी कर्जमाफी योजनेची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतरच नवीन पीक कर्जाचे वितरण सुरू होणार असल्याचे संकेत मिळत आहेत. त्यामुळे कर्जमाफीची अंमलबजावणी लांबली, तर त्याचा थेट परिणाम पीक कर्ज वितरणावर होईल, असा इशारा जाणकार देत आहेत.**



सध्या मुख्यमंत्र्यांनी कर्जमाफीची घोषणा केली असली तरी प्रत्यक्ष अंमलबजावणी अद्याप सुरू झालेली नाही. तांत्रिक पातळीवरील प्रक्रिया सुरू असून, सरकारने नियुक्त केलेल्या उच्चस्तरीय समितीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतरच पुढील निर्णय घेतला जाणार आहे. हा अहवाल एप्रिलच्या पंधरवाड्यात सादर होण्याची अपेक्षा व्यक्त केली असली तरी प्रत्यक्षात त्याला विलंबाची शक्यता आहे. कर्जमाफी प्रक्रिया अद्याप सुरू नसल्याने नवीन पीक कर्ज वितरणात विलंब होण्याची शक्यता आहे. यंदाचा खरीप हंगाम तोंडावर असून, पीककर्ज वाटपाच्या विलंबामुळे पेरणीपूर्व तयारीवर विपरीत परिणाम होऊ शकतो. राज्यातील कर्जबाजारी शेतकऱ्यांची स्थिती, कर्जरचनेचे स्वरूप, बँकांचा सहभाग आणि कर्जमाफीचा एकूण आर्थिक परिणाम यांचा सखोल अभ्यास करणे समितीसमोर मोठे आव्हान आहे. ▶▶ पान २ वर

### तांत्रिक प्रक्रिया सुरू !

राज्य सरकारने २०२६ च्या अर्थसंकल्पात ३० सप्टेंबर २०२५ पर्यंतचे २ लाखांपर्यंतचे पीककर्ज माफ करण्याची घोषणा केली असून, प्रत्यक्ष अंमलबजावणी ३० जून २०२६ पूर्वी पूर्ण करण्याचे आश्वासन दिले आहे. सध्या पात्र शेतकऱ्यांच्या याद्या निश्चित करण्यासाठी उच्चस्तरीय समिती काम करत आहे. या प्रक्रियेत बँक डेटा, जमीन मालकी दस्तऐवज आणि इतर तपासण्या समाविष्ट आहेत.

## बारामती केवळ मतदारसंघ नसून दादांचा श्वास ; प्रत्येक व्यक्ती माझ्यासाठी महत्त्वाची

### सुनेत्रा अजित पवार यांनी व्यक्त केल्या भावना:उमेदवारी अर्ज दाखल

बारामती । प्रतिनिधी

**बारामती बारामती हा केवळ मतदारसंघ नसून दादांचा श्वास होता आणि त्या श्वासाशी नाळ जुळलेली प्रत्येक व्यक्ती माझ्यासाठी महत्त्वाची असून ही निवडणूक माझी वैयक्तिक नसून दादांवर प्रेम करणाऱ्या प्रत्येक बारामतीकरांची आहे, अशा भावना उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी व्यक्त केल्या.**



पोटनिवडणुकीच्या पार्श्वभूमीवर बारामती विधानसभा मतदारसंघातील महायुतीचा सर्वपक्षीय कार्यकर्ता मेळावा सोमूवारी कविवर्य मोरोपंत नाट्यगृह येथे पार पडला. या मेळाव्याला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, पक्षाचे ज्येष्ठ नेते खासदार प्रफुल पटेल, प्रदेशाध्यक्ष खासदार सुनिल तटकरे, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते व अन्न व नागरी पुरवठामंत्री छगन भुजबळ, दिलीप वळसे पाटील, वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांच्यासह भाजप, शिवसेना, ▶▶ पान २ वर

## बारामती पोटनिवडणुकीतून शेवटच्या क्षणी लक्ष्मण हाकेंची माघार

बारामती । प्रतिनिधी

बारामती विधानसभा पोटनिवडणुकीच्या (२०२६) रणधुमाळीत सोमवारी एक मोठी राजकीय घडामोड घडली. ओबीसी आंदोलक लक्ष्मण हाके यांनी आपला उमेदवारी अर्ज न भरता निवडणुकीतून माघार घेण्याचा निर्णय घेतला आहे. महायुतीच्या नेत्यांनी आणि विशेषत: दत्तात्रय भरणे यांनी केलेल्या यशस्वी मध्यस्थीमुळे हाके यांनी सुनेत्रा पवार यांना पाठिंबा जाहीर दिला. यामुळे बारामतीमधील लढत आता थेट सुनेत्रा पवार विरुद्ध काँग्रेसचे आकाश मोरे अशी होणार आहे.



लक्ष्मण हाके हे आपला उमेदवारी अर्ज भरण्यासाठी बारामतीत दाखल झाले होते. मात्र, त्याच वेळी महायुतीचे नेते कामाला लागले. मंत्री दत्तात्रय भरणे यांनी तातडीने लक्ष्मण हाके यांची भेट घेतली. अजितदादांच्या निधनामुळे निर्माण झालेली भावनिक परिस्थिती आणि बारामतीच्या विकासाची निरंतरता लक्षात घेऊन ही निवडणूक बिनविरोध व्हावी किंवा किमान महायुतीला पाठिंबा मिळावा, यासाठी भरणे यांनी हाके यांची मनधरणी केली. स्वत: सुनेत्रा पवार यांनी लक्ष्मण हाके यांना फोन करून चर्चेचे आवाहन केले होते. याबद्दल बोलताना हाके म्हणाले की, सुनेत्रा ▶▶ पान २ वर

## दमानियांना भर पत्रकार परिषदेत रडू कोसळले

मुंबई । प्रतिनिधी

सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी सोमवारी भोंदू बाबा अशोक खरात आणि राजकीय नेत्यांच्या संबंधाबाबत पत्रकार परिषद घेतली. या पत्राकर परिषदेत त्यांनी राजकीय नेत्यांवर देखील कारवाई केल्याशिवाय असले प्रकार बंद होणार नाहीत असे वक्तव्य केले. त्या बोलताना भावूक देखील झाल्या. अंजली दमानिया यांच्याकडे अशोक खरातचे सीडीआर आले कसे अशी शंका शिवसेनेच्या प्रवक्त्या अंधारे यांनी व्यक्त केली होती. यावेळी मी हे सीडीआर कसे मिळवले अन् माहिती कशी गोळा केली हे सांगताना त्यांना अश्रू अनावर झाले. ▶▶ पान २ वर

## १३ कोटीच्या नव्या बस स्थानकाला भ्रष्टाचाराची गळती

### काझी संघाणी ग्रुपवर कारवाई ऐवजी पाठराखण करणारा एसटीचा खुलासा

बीड । प्रतिनिधी

तत्कालीन परिवहन मंत्री दिवाकर रावते व माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांच्या प्रयत्नांमधून येथील मध्यवर्ती बस स्थानकाच्या १३ कोटी रुपयांच्या नव्या इमारतीला मान्यता मिळाली ही इमारत तयार झाली मात्र नुकत्याच झालेल्या अवकाळी पावसात गळू लागल्याने या इमारतीचे कंत्राटदार काझी संघानी यांच्यावर कारवाई करण्याऐवजी कंत्राटदाराच्या इशाऱ्यावरच एसटी महामंडळाच्या अधिकाऱ्यांनी हास्यास्पद खुलासा केला आहे दि. १ एप्रिल रोजी झालेल्या अवकाळी पावसात बसस्थानकाच्या छतातून पाणी गळू लागल्याने प्रतीक्षालयात पाणी साचले. त्यामुळे प्रवाशांना उभे राहणे व बसणेही कठीण झाले होते. काही ठिकाणी छतामधून थेट पाण्याची धार लागली होती. ▶▶ पान २ वर

## ४ मे नंतर सर्वांचा हिशेब होणार !

### पश्चिम बंगालमध्ये मोदींचा विरोधकांना इशारा

कूचबिहार । वृत्तसंस्था

कूचबिहार येथे बंगालमधील पहिल्या प्रचारसभेला संबोधित करताना मोदी यांनी ममता बॅनर्जी सरकारवर जोरदार टीका केली. राज्याच्या भविष्यासाठी ही निवडणूक निर्णायक असून, ४ मेनंतर कायद्याचे राज्य प्रस्थापित झाल्यावर टीएमसीच्या गुंडांनी केलेल्या अत्याचारांचा चुन चुन



के हिसाब होगा, असा इशारा मोदी ▶▶ पान २ वर

## पोलिस कोठडीत बाप-लेकाच्या मृत्यू प्रकरणी ९ पोलिसांना मृत्यूदंडाची शिक्षा

मदुराई । वृत्तसंस्था

पोलिस कोठडीत झालेल्या बेदम मारहाणीमुळे बाप-लेकाचा मृत्यू झाल्याच्या प्रकरणात मदुराई जिल्हा न्यायालयाने मोठा निर्णय देत ९ पोलिस कर्मचाऱ्यांना मृत्यूदंडाची शिक्षा सुनावली आहे. या प्रकरणात निरीक्षक श्रीधर यांच्यावर १५ लाख रुपयांचा दंडही ठोठावण्यात आला आहे.

या प्रकरणातील दोषींमध्ये निरीक्षक श्रीधर, उपनिरीक्षक बालाकृष्णन व रघु गणेश तसेच पोलिस कर्मचारी मुरुगन, समदुरई, मुथुराजा, चेल्लादुरई, थॉमस फ्रान्सिस आणि वेइलुमुथु यांचा समावेश आहे. न्यायालयाने निरीक्षणात म्हटले की, "बाप-लेकाला सूडबुद्धीने निर्वस्त्र करून अमानुष मारहाण करण्यात आली. हा प्रकार वाचूनही अंगावर शहारे येतात. न्यायालयाच्या देखरेखीअभावी हे सत्य दडपले गेले असते." या प्रकरणात सीसीटीव्ही फुटेज सादर करण्यात आले, जे अशा प्रकरणांमध्ये क्वचितच घडते, असेही न्यायालयाने ▶▶ पान २ वर

## व्हीलचेअरवर बसून शरद पवारांनी घेतली शपथ

दिल्ली । वृत्तसंस्था

देशाच्या सर्वोच्च सभागृहामध्ये म्हणजेच राज्यसभेत सोमवारी नवनिर्वाचित सदस्यांच्या शपथविधीचा दिमाखदार सोहळा पार पडला. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते शरद पवार आणि रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे (आठवले) अध्यक्ष रामदास आठवले यांच्यासह एकूण १९ नवनिर्वाचित



सदस्यांनी आपल्या खासदारकीची अधिकृत शपथ ग्रहण केली. या सोहळ्यामुळे संसदेच्या वरिष्ठ सभागृहातील राजकीय हालचालींना नवा वेग प्राप्त झाला आहे.

हा शपथविधी सोहळा राज्यसभेचे पदसिद्ध अध्यक्ष तथा उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. या प्रसंगी राज्यसभेचे उपसभापती हरिवंश आणि केंद्रीय संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांची ▶▶ पान २ वर

# नरेंदर दे सिलेंडर!

### वंचित बहुजन आघाडी रस्त्यावर गॅस टंचाईविरोधात वंचित बहुजन आघाडीचे राज्यव्यापी आंदोलन

मुंबई । प्रतिनिधी

**राज्यात निर्माण झालेल्या गॅस सिलेंडर टंचाई, दरवाढ आणि पुरवठ्यातील विस्कळीतपणाच्या निषेधार्थ वंचित बहुजन आघाडीच्या वतीने ६ एप्रिल २०२६ रोजी महाराष्ट्रभर तीव्र आंदोलन छेडण्यात आले. "नरेंदर, कब मिलेगा सिलेंडर?" आणि "नरेंदर, दे सिलेंडर" अशा घोषणांनी राज्यातील जिल्हा, शहर आणि तालुका स्तरावरील परिसर दणाणून गेला.**

या राज्यव्यापी आंदोलनात सर्वसामान्य नागरिक, महिला, कार्यकर्ते आणि पदाधिकारी मोठ्या संख्येने सहभागी झाले. गॅस सिलेंडरचा तुटवडा, वाढते दर आणि काळाबाजार यामुळे नागरिकांना



मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असल्याचा आरोप करत शासनाचे लक्ष वेधण्यात आले. गेवराई येथे तहसील कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात आले. कृत्रिम तुटवडा आणि काळाबाजाराविरोधात जोरदार निषेध नोंदवत प्रशासनावर कारवाईची मागणी करण्यात आली. "नरेंदर, कब देगा सिलेंडर" या घोषणांनी परिसर दुमदुमला. हिंगोली-औंढा नागनाथ येथे मोर्चा काढून प्रशासनाला निवेदन देण्यात आले. गॅस टंचाई, दरवाढ आणि पुरवठ्यातील अनियमितता यावर तीव्र नाराजी व्यक्त करत नागरिकांना दिलासा देण्याची मागणी करण्यात आली. बीडमध्ये जिल्हाधिकारी कार्यालयासमोर "चूल पेटवा" ▶▶ पान २ वर

## अंबाजोगाईत निवासी डॉक्टरची आत्महत्त्या

अंबाजोगाई । प्रतिनिधी



येथील स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालयात त्वचा रोग विषयात पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या मंदार उमेश दाभाडे (वय २८) या विद्यार्थ्याने आज पहाटे राहत्या खोलीत गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या घटनेमुळे अंबाजोगाई शहरासह वैद्यकीय क्षेत्रात सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे. मूळचा पुणे येथील रहिवासी असलेला मंदार हा या महाविद्यालयात पदव्युत्तर शिक्षणाच्या दुसऱ्या वर्षात शिक्षण घेत होता.मिळालेल्या माहितीनुसार, मंदार हा अंबाजोगाई ते चनई रोडवरील संत रविदास नगर भागातील एका इमारतीमध्ये तिसऱ्या मजल्यावर भाड्याने राहत होता. आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलण्यापूर्वी त्याने कालच आपल्या घरमालकाला फोन-पे द्वारे तीन हजार रुपये घरभाडे पाठवले होते. त्यानंतर ६ एप्रिल सोमवार रोजी पहाटे पाचच्या सुमारास त्याने आपल्या भावाला मोबाईलचा पासवर्ड संदेशाद्वारे पाठवला आणि ▶▶ पान २ वर

cmyk

cmyk

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
मंगळवार दि. ७ एप्रिल २०२६



## थोडक्यात

### उन्हाळी कबड्डी प्रशिक्षणाचे उद्घाटन संपन्न!

बीड । प्रतिनिधी

येथील श्रीमंतयोगी छत्रपती शिवाजी महाराज क्रीडांगणावर उन्हाळी कबड्डी प्रशिक्षणाचे उद्घाटन ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते प्रा.लक्ष्मण गुंजाळ यांचे हस्ते झाले. कबड्डी या मैदानी खेळाचे राज्य प्रशिक्षक प्रा.तानाजी आगळे यांच्या मार्गदर्शनाखाली शालेय आणि महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना कबड्डी खेळाचे प्रशिक्षण चांगल्या प्रकारे देण्याचा प्रयत्न सातत्याने केला जातो. परिणामी प्रा. आगळे यांच्या मार्गदर्शनामुळे अर्थात प्रशिक्षणामुळे शेकडो कबड्डीपटू राज्यस्तरावर खेळले आहेत. खेळत आहेत.



याच उपक्रमाचा एक भाग म्हणून विविध वयोगटातील खेळाडूंसाठी उन्हाळी कबड्डीचे मोफत प्रशिक्षणाचा शुभारंभ ता. ५ एप्रिल रोजी संपन्न झाला. उन्हाळी सत्राचे प्रशिक्षक म्हणून नितीन गर्जे हे काम पाहणार आहेत. याप्रसंगी प्रा.भास्कर चादर यांची विशेष उपस्थिती होती.यावेळी प्रशिक्षणाचे उद्घाटन श्रीफळ वाढुन करण्यात आले.खेळाडूंचा परिचय प्रा.तानाजी आगळे यांनी करून दिला. कबड्डी खेळाचे कौशल्य, मेहनत, जिद्द या आधारे चांगले कबड्डी पटू तयार होऊ शकतात.प्रा. आगळे आणि प्रा गर्जे यांच्या मार्गदर्शनाखाली खेळाडूंनी अतिशय शिस्तीत, नम्रतेने हे प्रशिक्षण घ्यावे त्यांना नक्की यश मिळेल. खेळाचा नियमित सराव हा खेळाडूंना यश मिळवून देत असतो, असे यावेळी प्रा. गुंजाळ आणि प्रा चादर म्हणाले.

### आष्टीत महात्मा फुले जयंती निमित्त भव्य उत्सवाचे आयोजन–सुरज शिंदे

आष्टी । प्रतिनिधी

क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिराव फुले यांच्या जयंतीनिमित्त ११ एप्रिल २०२६ रोजी आष्टी शहरात महात्मा फुले प्रतिष्ठानच्या वतीने विविध सामाजिक, सांस्कृतिक व वैचारिक कार्यक्रमांचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. या उत्सवात सर्वधर्मीय व सर्व समाजघटकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन सामाजिक कार्यकर्ते सुरज किसन शिंदे यांनी केले आहे. याबाबत बोलताना शिंदे म्हणाले की, महात्मा फुले यांनी बहुजन समाजासह महिलांसाठी शिक्षणाची दारे उघडून समाज परिवर्तनाची नवी दिशा दिली. त्यांचे कार्य कोणत्याही एका जातीपुरते मर्यादित नसून संपूर्ण मानवजातीच्या कल्याणासाठी होते. मात्र, सध्याच्या काळात महापुरुषांना जातीच्या चौकटीत बंदिस्त करण्याची प्रवृत्ती वाढत असल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. ते पुढे म्हणाले, '''विद्येविना मती गेली' हा जीवनमंत्र देणारे फुले हे खऱ्या अर्थाने आधुनिक भारताचे शिल्पकार होते. शेतकरी, मजूर व वंचित घटकांच्या उन्नतीसाठी त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य अर्पण केले. त्यामुळे त्यांची जयंती साजरी करणे हे प्रत्येक जागरूक भारतीयाचे कर्तव्य आहे.''



विविध कार्यक्रमांची रेलचेल

महात्मा फुले जयंतीनिमित्त ११ एप्रिल रोजी सकाळी १० वाजता आष्टी शहरात त्यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात येणार आहे. त्यानंतर सायंकाळी भव्य मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले असून, यामध्ये विविध राज्यांतील पारंपरिक वाद्य पथकांचा सहभाग असणार आहे.याच पार्श्वभूमीवर ९ एप्रिल रोजी श्री संत सावता मंदिर येथे रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले आहे. तसेच युवकांमध्ये वैचारिक जागृती घडवून आणण्यासाठी वक्तृत्व स्पर्धेसारखे उपक्रमही राबविण्यात येणार आहेत.या सर्व कार्यक्रमांमध्ये शहर व परिसरातील नागरिक, युवक, माता–भगिनी तसेच सर्व समाजघटकांनी कोणताही भेदभाव न करता मोठ्या संख्येने सहभागी व्हावे आणि क्रांतीसूर्य महात्मा फुले यांच्या कार्याप्रती कृतज्ञता व्यक्त करावी, असे आवाहन सुरज शिंदे यांनी केले आहे.

# 'चूल पेटवा' आंदोलनात जिल्हाधिकारी बीड यांना भाकर-कांदा-टमाटर-मिरची देत वंचित बहुजन आघाडीचे निवेदन

बीड । प्रतिनिधी

राज्यात सुरू असलेल्या गॅस टंचाईच्या निषेधार्थ वंचित बहुजन आघाडीच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर ''चूल पेटवा'' आंदोलन करण्यात आले. यावेळी आंदोलनकर्त्यांनी प्रतीकात्मक स्वरूपात भाकर, कांदा, टमाटर व मिरची देत जिल्हाधिकारी यांना निवेदन सादर करून शासनाचे लक्ष वेधले.



या आंदोलनाद्वारे ''नरेंद्र कब मिलेगा सिलेंडर'' असा सवाल उपस्थित करत गॅस टंचाईमुळे सर्वसामान्य जनतेच्या दैनंदिन जीवनावर झालेल्या गंभीर परिणामांकडे लक्ष वेधण्यात आले. आंदोलनकर्त्यांनी सांगितले की, गॅसच्या तुटवड्यामुळे स्वयंपाकघरातील शेगड्या थंड पडल्या असून चहाच्या टपऱ्या, रस्त्यावरील खाद्य स्टॉल्स बंद पडले आहेत. अनेकांना पुन्हा कोळसा व लाकडाच्या चुलीवर स्वयंपाक करण्याची वेळ आली आहे.

काही दिवसांपूर्वी अकोला येथे गॅस सिलेंडरसाठी रांगेत उभे असताना माजी सरपंच शंकरराव शिरसाठ यांचा मृत्यू झाला, तर अमरावती येथेही एका तरुणाचा दुर्दैवी मृत्यू झाला असल्याचे आंदोलनकर्त्यांनी नमूद केले. यावरून परिस्थितीची गंभीरता अधोरेखित होत असल्याचे त्यांनी सांगितले.

महाराष्ट्रातील हजारो छोटे व्यावसायिक, हॉटेल्स, केटरिंग व्यवसाय, तसेच एलपीजीवर चालणाऱ्या रिक्षा चालकांवर या टंचाईचा मोठा परिणाम झाला आहे. लग्नसमारंभ, धार्मिक कार्यक्रम पुढे ढकलण्यात येत असून विद्यार्थ्यांच्या मेसमधील जेवण व्यवस्था देखील विस्कळीत झाली आहे.

वंचित बहुजन आघाडीचे नेते बाळासाहेब आंबेडकर यांनी ११ मार्च रोजी दिलेल्या इशाऱ्याची आठवण करून देत आंदोलनकर्त्यांनी सांगितले की, सरकारच्या निष्क्रियतेमुळे आज ही परिस्थिती उद्भवली आहे. सरकार परिस्थिती सामान्य असल्याचा दावा करत असले तरी प्रत्यक्षात नागरिकांना गॅस सिलेंडरसाठी तासन्तास रांगेत उभे राहावे लागत आहे.

यावेळी गॅस सिलेंडरचा काळाबाजार मोठ्या प्रमाणावर होत असल्याचा आरोप करण्यात आला. काही ठिकाणी सिलेंडर ५ ते ७ हजार रुपयांना विकला जात असल्याचेही निदर्शनास आणण्यात आले. गॅस सिलेंडरची कृत्रिम टंचाई तात्काळ थांबवावी, काळाबाजार रोखून दोषींवर कठोर कारवाई करावी, २५ दिवसांनंतर गॅस मिळण्याची अट शिथिल करावी, विद्यार्थ्यांसाठी कम्युनिटी किचन सुरू करावे, परिस्थिती कधी सामान्य होणार याबाबत स्पष्ट माहिती द्यावी, अडचणी दूर करून तातडीने गॅस पुरवठा करावा

### उज्ज्वला योजनेचे जिल्हास्तरावर ऑडिट करावे

या आंदोलनात वंचितचे जिल्हाध्यक्ष अजय सरवदे, महासचिव खंडू नाना जाधव, उपाध्यक्ष ज्ञानेश्वर कवठेकर, युवक अध्यक्ष अनुरथ वीर, अर्जुन जोंजाळ, राजेश जोगदंड, रोहन मगर, पुष्पा तुरुकमारे राणीताई बचूटे, तालुका अध्यक्ष किरण वाघमारे, लखन जोगदंड, सतीश पायाळ, श्रीकांत वाघमारे, मिलिंद सरपते, संदीप जाधव, सुशील काकडे, धम्मानंद वाघमारे, प्रेम कांबळे, मोतीराम बचुटे, प्रफुल्ल बचुटे, जयराम काळे, शिवाजी वाव्हळकर, तुषार गायकवाड, पंचशीला वाव्हळकर, ऋषिकेश वाघमारे, आनंद शिंदे, कुमार साबळे, अमर ससाने, यश भैय्या प्रधान यांच्यासह वंचित बहुजन आघाडीचे पदाधिकारी, कार्यकर्ते व भारतीय बौद्ध महासभेच्या महिला पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# गेवराईत भाजपा पक्ष स्थापना दिनी मोटरसायकल रॅली

**गेवराई । प्रतिनिधी**

भारतीय जनता पार्टी पक्ष स्थापना दिनानिमित्त दिनांक ६ एप्रिल २०२६ रोजी माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांच्या निवासस्थानापासून भाजपच्या कार्यकर्त्यांनी विराट मोटार सायकल रॅली काढली. या रॅलीला माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांनी झेंडा दाखवला.



भारतीय जनता पार्टी पक्ष स्थापना दिनानिमित्त गेवराईतील माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांच्या निवासस्थानापासून भारतीय जनता पार्टीचा ध्वज हातात घेऊन ज्येष्ठ आणि युवा पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी विराट मोटरसायकल रॅली काढली. या रॅलीला भाजप नेते माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांनी झेंडा दाखवून सुरुवात केली. बीड जिल्हा परिषदेचे माजी अर्थ व बांधकाम सभापती युधाजित पंडित, युवानेते शिवराज पवार, युवानेते रोहित पंडित, युवानेते यशराज पंडित यांच्यासह माजी तालुकाध्यक्ष प्रकाशराव सुरवसे, अॅड सुरेशराव हात्ते, गेवराई विधानसभा भाजप समन्वयक श्रीकांत सानप, तालुका अध्यक्ष सचिन दाभाडे, माजी सभापती भीष्मचार्य दाभाडे, माजी सभापती पंढरीनाथ लगड, न प सभापती शेख शेहदाद, न प सभापती महेश सौंदरमल, नगरसेवक राजेश टाक, नगरसेवक प्रथमेश एकनाथ लाड, नगरसेवक सज्जाद भाई बागवान, माजी सरपंच संतराम काळे, नगरसेवक पिंटू काकडे,

भाजप पूर्व मंडळ अध्यक्ष राजेश पवार, संतोष थोरात, विकास पवार, अशोकराव शिंदे, अंबादास पिसाळ, दुरेश चिकने, रणजीत शर्मा, कृष्णा बारगजे, सुनील ढाकणे, राजाभाऊ रोमन, तांगडे मामा, शेख सुलेमान, बबलू खराडे, सरपंच मुकुंद बाबर, विलास शिंदे, बदाम पौळ, पवार, शेख सिराज, बाळासाहेब सानप, पप्पू कोठेकर, अमोल सुतार, संतोष दायमा, कैलास राठोड, माजी सभापती गीताराम डोंगरे, अॅड डिंगरे, चंद्रसेन जाधव, भागवतराव ढेंबरे, सुनील जाधव, सुनील कांडेकर आदींसह शेकडो भाजपा पदाधिकारी या मोटरसायकल रॅलीमध्ये सहभागी झाले होते. ही मोटरसायकल रॅली बदामराव पंडित यांचे निवासस्थानापासून छत्रपती शिवाजी महाराज चौक, शास्त्री चौक, गेवराई शहर मिरवणूक मार्ग, डॉ बाबासाहेब आंबेडकर चौक, संत सेवालाल महाराज चौक ते भाजपा कार्यालय कोल्हेर रोड पर्यंत रॅली काढण्यात आली.

## पान ६ वरुन...

### सहाल चाऊस लोकांच्या

नगराध्यक्ष शिफा बिलाल चाऊस, नारायण डक,उपनगराध्यक्ष सहाल चाऊस,मुख्याधिकारी बोंदर, उपसभापती श्रीहरी मोरे,नवनाथ धायजे,विश्वंभर थावरे,शकील कुरेशी,बिलाल चाऊस सह,इत्यादी मान्यवरांची उपस्थिती होती. यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना आ.प्रकाश सोळंके म्हणाले की,सहाल चाऊस यांचं नेतृत्व लोकांच्या प्रेमातून तयार झालं आहे.ही योजना प्रशासकीय काळात मी कार्यान्वित केली आहे. परंतु या योजनेच्या जलकुंभासाठी जागा उपलब्ध करून देण्याचे कठीण काम सहाल चाऊस यांनी पार पाडले आहेत.शहरासाठी काम करण्याच्या त्यांच्या तळमळीमुळेच उपनगराध्यक्ष करण्यासाठी मी त्यांना नगर परिषदेत सहकार्य केलं आहे.असे त्यांनी यावेळी सांगितले.

माजलगाव शहरासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण ठरणाऱ्या महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान अंतर्गत पाणीपुरवठा योजनेतुन शहरातील नागरिकांचा पाण्याचा कायमचा प्रश्न मिटणार आहे.९८ कोटीची ही पाणीपुरवठा योजना ११ महिन्यात तयार होऊन शहरालातल्या प्रत्येक घरापर्यंत हे पाणी पोहोचणार आहे.असेही आ. सोळके यांनी यावेळी म्हणाले.तर चांगल्या गार्डनसाठी १ कोटी रुपयाचा निधी उपलब्ध झाला असल्याचेही त्यांनी त्यावेळी सांगितले.दरम्यान शहरात अद्याप ५० कोटीची विकास कामे अजून व्हायची राहिले आहेत.त्यासाठी पैसाही उपलब्ध आहे.नगरपरिषदेने ते नियोजित वेळेत करण्याच्या सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या.तर विकास कामासंदर्भात मार्गदर्शन करताना पोटभरे यांनी सांगितले की फक्त काम खेचून आणणे विकास नाहीतर कामे दर्जेदार करून घेणे हा खरा विकास आहे.संबंधित गुत्तेदाराने पाणीपुरवठ्याचे काम दर्जेदार करावे.अशा सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या.दरम्यान माजी आ.डीके देशमुख,माजी आ. मोहनराव सोळके,नारायण डक यांचीही आपले मनोगत यावेळी व्यक्त केले.तर प्रस्ताविक भाषणात शिफा बिलाल चाऊस, उपनगराध्यक्ष सहाल चाऊस यांनी शहरातील पाणीटंचाईचा प्रश्न मोठ्या प्रमाणात मार्गी लागनार असल्याचे सांगत चार उंच जलकुंभांद्वारे नागरिकांना नियमित व शुद्ध पाणीपुरवठा केला जाणार आहे.शहराच्या विकासाच्या दृष्टीने हा प्रकल्प महत्त्वाचा टप्पा ठरणार असल्याची ग्वाही त्यांनी यावेळी उपस्थितांना दिली.दरम्यान कार्यक्रमाचे प्रास्ताविक मनोहर डाके यांनी केले तर आभार मुख्याधिकारी सुंदर बोंदर यांनी मानले.यावेळी इंजिनीयर मारुती गीत्तेसह सर्व नगरसेवक नगर परिषद कर्मचारी,नागरिकांची मोठी उपस्थिती होती.

### बीड पोलिसांचा संवाद

त्यांना थेट ऑनलाइन तक्रार नोंदविण्याची सुविधा मिळते, ज्यामुळे वेळ आणि श्रमांची मोठी बचत होत आहे.

गोपनीयता आणि तत्पर कार्यवाही

या माध्यमातून प्राप्त होणाऱ्या प्रत्येक तक्रारीची गांभीर्याने दखल घेऊन संबंधित पोलीस अधिकारी त्वरित चौकशी आणि कायदेशीर कार्यवाही करत आहेत. विशेष म्हणजे, अवैध धंद्यांची माहिती देणाऱ्या नागरिकांची ओळख पूर्णपणे गोपनीय ठेवली जात आहे. यामुळे पोलीस प्रशासनावरील नागरिकांचा विश्वास अधिक वृद्धिंगत झाला आहे.

### महापुरुषांच्या अनाधिकृत

स्थानिक प्रशासनाची परवानगी न घेता रातोरात महापुरुषांचे पुतळे उभारले जात असल्याचे प्रकार वाढले आहेत. विशेषतः वादग्रस्त ठिकाणी उभारण्यात आलेल्या अशा अनाधिकृत स्मारकांमुळे समाजात तणाव निर्माण होऊन सामाजिक सलोखा बिघडण्याची शक्यता वाढते. त्यामुळे अशा प्रकरणांची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली. दरम्यान, सामान्य प्रशासन विभागाने २ मे २०१७ रोजी पुतळा धोरणासंदर्भात शासन निर्णय जारी केला असून, त्यानुसार पुतळा उभारण्यासाठी जिल्हास्तरीय समितीची पूर्वपरवानगी आवश्यक आहे. तसेच पुतळ्याचे ठिकाण वादग्रस्त नसावे, वाहतुकीस अडथळा निर्माण होऊ नये, उंची व साहित्याला तांत्रिक मान्यता असावी, तसेच कायदा व सुव्यवस्था लक्षात घेऊन शपथपत्र व 'ना हरकत' प्रमाणपत्र घेणे बंधनकारक आहे. या सर्व नियमांचे काटेकोर पालन करूनच पुतळे उभारावेत, अन्यथा संबंधितांवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी ठाम भूमिका डॉ. गणेश ढवळे यांनी यावेळी व्यक्त केली.

### भोंदू बाबा अशोक खरातवर

स्थापन करावा.जादूटोणा विरोधी कायद्याची कडक अंमलबजावणी करावी.

श्रद्धेच्या नावाखाली अंधश्रद्धेला राजाश्रय मिळत आहे अशी टीका करत, सरकारने या प्रकरणातील दोषींवर तातडीने गुन्हे दाखल न केल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा कॉ.सय्यद मुसद्दीक बाबा यांनी दिला आहे यावेळी निदर्शनात कॉ.मोहन जाधव, कॉ. सुहास झोडगे कॉ. विजय राठोड कॉ.सय्यद फारूक कॉ. विठ्ठल सकराते कॉ.कृष्णा सोळंके कॉ.महबूब शेख कॉ.एकनाथ सकराते कॉ.शेषराव अबुज कॉ.रामभाऊ राऊत आणि रफिक सय्यद इतर कार्यकर्त्यांनी सहभाग घेतला.

### पाटोद्यात काँग्रेसचे 'संघटन

श्रीमती विद्याताई पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत यशस्वी झाला.

**कार्यकर्त्यांचा निर्धार:** बैठकीत तालुक्यातील पदाधिकाऱ्यांनी पक्षाची ध्येयधोरणे तळागाळातील जनतेपर्यंत पोहोचवण्याचा संकल्प केला. यावेळी जिल्हा उपाध्यक्ष प्रवीण भैय्या शेप, बाळासाहेब ठोंबरे, तालुकाध्यक्ष राहुल जाधव, शिवाजीराव कोकाटे, आनंदराव कोकाटे, सुनील काळे, विशाल मस्के, गणेश बिजगुडे, शेख इल्यास, लक्ष्मण भाकरे, मारुतीराव पवळ, माणिक जाधव, अशोक येवले यांसह मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते.

# वाळुंज भैरवनाथ यात्रेत पुन्हा दुमदुमले घुंगरांचे नाद; छबिना मिरवणुकीत पारंपरिक वाद्यांचा गजर

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील सर्वात मोठी आणि ऐतिहासिक ओळख असलेली वाळुंज येथील भैरवनाथाची यात्रा यंदा अभूतपूर्व उत्साहात पार पडली. अनेक वर्षांनंतर छबिना मिरवणुकीत नृत्यकांचे मुके झालेले घुंगरू पुन्हा खणखणले, तर पारंपरिक वाद्यांच्या गजराने संपूर्ण गाव दुमदुमून गेले.



चैत्र पौर्णिमेनंतर येणाऱ्या रविवारी दरवर्षीप्रमाणे भरवली जाणारी ही यात्रा यंदाही मोठ्या उत्साहात संपन्न झाली. आष्टी तालुक्यासह शेजारील जिल्ह्यांमधूनही हजारो भाविकांनी वाळुंज येथे गर्दी केली होती.

यात्रेची खास परंपरा असलेल्या संध्याकाळच्या छबिना मिरवणुकीत भैरवनाथाच्या पालखीसोबत नृत्य सादर करण्याची जुनी परंपरा पुन्हा सुरू करण्यात आली. काही वर्षांपूर्वी ही प्रथा बंद झाल्याने यात्रेचा रंग कमी झाल्याची भावना ग्रामस्थांमध्ये होती. मात्र, गावकऱ्यांच्या आग्रहानंतर आमदार सुरेश धस यांनी पुढाकार घेत ही परंपरा पुन्हा सुरू केली.

छबिना मिरवणुकीदरम्यान आमदार सुरेश धस यांनी स्वतः पारंपरिक ढोल वाजवत वाद्यांचा गजर केला. त्यांच्या सहभागामुळे भाविकांचा उत्साह द्विगुणित झाला. स्वर्गीय धस दादा यांनी जपलेली ही परंपरा पुढे नेण्याचे काम आमदार धस करत असल्याचे ग्रामस्थांनी सांगितले. यात्रेत मोठ्या प्रमाणावर मिठाईची दुकाने, संसारोपयोगी वस्तूंचे स्टॉल तसेच उन्हाळ्यामुळे थंड पेयांचे स्टॉलही उभारण्यात आले होते. भाविकांच्या सोयीसाठी विविध सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. भैरवनाथ मंदिराच्या जीर्णोद्धारासाठी भाविकांकडून मोठ्या प्रमाणावर देणग्या दिल्या जात असून, मंदिर विकासासाठी आमदार धस यांनीही मोठा निधी उपलब्ध करून दिला आहे. गावात विविध विकासकामेही सुरू असल्याची माहिती देण्यात आली. दरम्यान, यात्रेच्या निमित्ताने सकाळी पारंपरिक 'आंबील मिरवणूक' काढण्यात आली. या मिरवणुकीचा मान परंपरेनुसार शिंदे कुटुंबाला देण्यात येत असून, ही परंपरा आजही कायम ठेवण्यात आली आहे.एकूणच, वाळुंज भैरवनाथाची यात्रा यंदा पारंपरिकतेचा वारसा आणि नव्या उत्साहाचा संगम ठरली.

# १२ महिणे २४ तास अविरत सुरु असलेली पाणीपोईचा ४ वर्धापन

गेवराई । प्रतिनीधी

शहरातील कोरबु गल्ली येथे शेख युनूस फंटर यांच्या स्मरणार्थ १२ महिणे २४ तास अविरत सुरु असलेली एकमेव पाणीपोईचा चौथे वर्षपूर्ती चा शुभारंभ तालुक्याचे दोन्ही युवानेते

मा.शिवराजदादा पवार, मा.यशराजभैय्या पंडित नगरसेवक शेख खाजा मामू, शहेदाद भाऊ शेख, मा.नगरसेवक सय्यद एजाज मेंबर, खदीर मामू बागवान ,पत्रकार सय्यद कौसर, जावेद पठाण,खय्युम बागवान, जावेद बागवान, मिनाज पटेल,अतुल्ला पठाण, आनिस भाई,शेख फरदीन,मसुद पठाण,राजा पठाण,सय्यद नेहाल,मौलाना ताहेर,शेख अफ्रिदी,शेख अशरफ, रईस भाई,बाबा पठाण, इतर मित्रगण परिवार आवर्जून उपस्थित होते.









शेख युनूस फटंर यांचे मोठा मित्र परिवार होता तसेच कोणाच्याही कामाला येणारा माणूस म्हणून त्यांचे कार्य उल्लेखनीय होते. ४ वर्षापूर्वी त्यांचे दुखःद निधन झाले होते. शेख युनूस फंटर यांचे नाव या लौकसेवापयोगी सेवेने अजरामर करण्याचे कार्य त्यांचे बंधू शेख अनीस,शेख एजाज,शेख इद्रीस तसेच मित्र परिवाराने केले आहे.

गेल्या ४ वर्षापासून कोरबू चौक येथे १२ महिणे २४ तास शुध्द पिण्याचे पाणी तहानलेल्यांची तहान भागविण्याचे कार्य होत आहे, रोजच्या रोज पाणीचा भरणा केला जात असून चौकाच्या मध्यभागी खेडयापाडयातून तसेच मोंढा भागातून कष्टकरी, मजूर व अबालवृध्द, बच्चेकंपनीना या पाणपोईचा लाभ होताना दिसत आहे, यापाणपोईसाठी दररोज शेख एजाज, इदीस हे नित्यनेमाने प्रयत्नशील असतात, तत्पर राहतात. गेवराई शहरातील २४ तास १२ महिने सुरु असलेले एकमेव पाणीपोई म्हणजे शेख युनूस फंटर स्मरनार्थ पाणीपोई होय. या पाणीपोईचा लाभ रस्त्यावरचे येणे–जाणे करणा–या, पादचा–यांना या कडक उन्हाळयात मोठया प्रमाणात होत आहे, या पुण्यकर्माचे दुवॉ–अशिर्वाद शेख युनूस फंटर यांना मिळत असणार यात शंका नाही. याप्रसंगी शरबत चे वाटप करण्यात आले होते,युनूस फंटर हे नाव या माध्यमातून हयात आहे.

# माजलगांवात भाजपा तालुका कार्यालयाचे उद्घाटन संपन्न

माजलगांव । प्रतिनिधी

माजलगांव शहरातील छत्रपती संभाजी महाराज चौक येथे भारतीय जनता पार्टीच्या तालुका कार्यालयाचे उद्घाटन उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. नव्या कार्यालयामुळे पक्षाच्या संघटनात्मक कामाला अधिक गती मिळणार असून कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले आहे. हा कार्यक्रम दि.६ एप्रिल सोमवार रोजी दुपारी २:०० वाजता आयोजित करण्यात आला होता.







या कार्यालयाचे उद्घाटन भाजपा जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र राज्य परिषद सदस्य अरुण आबा राऊत होते. यावेळी भाजपचे प्रवक्ते राम कुलकर्णी, जिल्हा उपाध्यक्ष बाबासाहेब चोले, तसेच भारतीय जनता पार्टीचे जिल्हा सचिव तथा नगरसेवक दीपक मेंडके यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी ज्ञानेश्वर मेंडके, शिवाजी राजवण,नितीन नाईकनवरे,डॉ. अशोक तिडके, दीपक मुंडे,अभय होके, ईश्वर खुरपे, हनुमान कदम, शरद कचरे, प्रदीप जाधवर, कल्याण शेप, सचिन तौर, सिद्धेश्वर राठोड दत्ता महाजन, बाळासाहेब क्षीरसागर, सुभाष साळवे,आदींसह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. उद्घाटन प्रसंगी बोलताना शंकर देशमुख यांनी माजलगाव तालुक्यात भाजपची ताकद वाढत असल्याचे सांगितले. नव्या कार्यालयामुळे कार्यकर्त्यांना एकत्र येऊन अधिक प्रभावीपणे काम करता येईल. तसेच आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर हे कार्यालय महत्त्वाची भूमिका बजावेल, असे त्यांनी नमूद केले. प्रवक्ते राम कुलकर्णी यांनी आपल्या भाषणात भारतीय जनता पार्टीच्या स्थापनेपासून आजपर्यंतचा प्रवास उलगडला. जनसंघाच्या स्थापनेपासून ते आजच्या सशक्त भाजपा पर्यंतचा इतिहास त्यांनी स्पष्ट केला. डॉ. श्यामा प्रसाद मुखर्जी यांच्या बलिदानाचा उल्लेख करत कलम ३७० विरोधातील भूमिका, तसेच २०१४ नंतर देशात झालेला बदल आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली पक्षाची वाढ यावर त्यांनी प्रकाश टाकला.भारतीय जनता पार्टी ही केवळ राजकारण करणारी संस्था नसून समाजकारणाला प्राधान्य देणारी संघटना आहे. या कार्यालयामध्ये ८० टक्के समाजकारण आणि २० टक्के राजकारण झाले पाहिजे,'' असे मत त्यांनी व्यक्त केले. तसेच कार्यकर्त्यांनी पद–प्रतिष्ठेपेक्षा पक्षविचार, निष्ठा आणि जनसेवा यांना महत्त्व द्यावे, असे आवाहनही त्यांनी केले. कार्यक्रमात इतर मान्यवरांनीही मनोगत व्यक्त करत पक्ष संघटन मजबूत करण्यासाठी एकजुटीने काम करण्याचे आवाहन केले. उद्घाटनानंतर कार्यकर्त्यांनी जल्लोष करत एकमेकांना शुभेच्छा दिल्या. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शहराध्यक्ष विनायक रत्नपारखी, किट्टी आडगाव मंडळ अध्यक्ष रुपाली कचरे तसेच पात्रुड अध्यक्ष डॉ. अभिजित सोळंके यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अनंत जगताप यांनी केले, तर आभार प्रदर्शन रुपाली कचरे यांनी मानले.

राज्य लोकतंत्र
शेत-शिवार
मंगळवार दि.७ एप्रिल २०२६


# केंद्रीय कृषिमंत्री चौहान यांनी घेतला नुकसानीचा आढावा

## शेतकऱ्यांना मदतीचे आश्वासन

दिल्ली / वृत्तसंस्था

विविध राज्यांमधील अवकाळी पाऊस आणि गारपीटीमुळे झालेल्या शेतीपिकांच्या नुकसानीचा आढावा घेत कृषी मंत्रालयातील अधिकाऱ्यांना तातडीने माहिती गोळा करण्याचे निर्देश केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंग चौहान यांनी दिले. तसेच नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना मदत देण्याचे आश्वासनही कृषिमंत्र्यांनी दिले आहेत.

कृषिमंत्री चौहान म्हणाले, ''या संकटाच्या वेळी मोदी सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी ठाम उभे आहे. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना वेळेवर मदत आणि विमा दावे मंजूर करण्यासाठी वैज्ञानिक पद्धतीने आकलन केले जाईल.'' असे त्यांनी स्पष्ट केले. रब्बी हंगामातील पिकांची काढणी सुरु आहे. परंतु बहुतांश राज्यांमध्ये अवकाळी पाऊस आणि गारपीटीने मोठ्या प्रमाणात नुकसान केले आहे. त्यामुळे शेतकरी हैराण झाले आहेत. या पार्श्वभूमीवर नुकसानीची माहिती गोळा करण्यासाठी राज्य सरकारांशी समन्वय साधण्याच्या सूचना अधिकाऱ्यांना केली असून नुकसानीचे योग्य



मूल्यांकन करण्याचे निर्देश दिले आहेत. मंत्रालयाने प्रसिद्ध केलेल्या निवेदनानुसार, चौहान यांनी अधिकाऱ्यांना बाधित राज्यांशी संपर्क साधण्यास सांगितले आहे. त्यानुसार रविवारपासूनच बाधित राज्यांच्या कृषी मंत्र्यांशी चर्चा करून नुकसानीच्या प्रमाणाबाबत सविस्तर माहिती अधिकारी घेत आहेत. भारतीय हवामानशास्त्र विभागाने ७ एप्रिलपासून उत्तर-पश्चिम भारतावर एक नवीन पश्चिमी झंझावात निर्णयात होण्याची शक्यता वर्तवली आहे. तसेच १० एप्रिलपर्यंत जम्मू, काश्मीर, हिमाचल प्रदेश, उत्तराखंड, पंजाब, हरियाणा, दिल्ली आणि उत्तर प्रदेश मुसळधार पाऊस, वादळी वारे, मेघगर्जनासह गारपिटी होण्याचा अंदाज दिला आहे. उत्तर-पश्चिम भारतात ७ ते १० एप्रिल दरम्यान कमाल तापमान ३ ते ५ अंश सेल्सिअसने घसरणार असून पूर्व भारतात ५ ते ८ एप्रिल दरम्यान ३ ते ४ अंश सेल्सिअसने घट होण्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. दरम्यान, राज्यात फेब्रूवारी, मार्च महिन्यासह ४ एप्रिलपर्यंत २ लाख ४ हजार हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले आहे. यामध्ये गहू, ज्वारी, हरभरा, मका, कांदा भाजीपाला पिके आणि फळपिकांचा समावेश आहे. त्यामुळे सरकारने तातडीने मदत द्यावी, अशी मागणी शेतकरी करत आहेत.

## सुरू करा कोळंबीचा व्यवसाय ! एक एकर पाण्यात २-३ लाखांपर्यंतचा नफा



भारतातील ग्रामीण भागात कोळंबीचे मासे मोठ्या प्रमाणात पाळले जातात. या मत्स्यशेतीसाठी समुद्राचे खारे पाणी लागत असले तरी अलीकडच्या काळात कृषी क्षेत्रातील तांत्रिक विकास आणि संशोधनामुळे ते गोड्या पाण्यातही पाळणे शक्य झाले आहे. गेल्या काही वर्षांत भारतातील मत्स्यव्यवसाय क्षेत्रात मोठा बदल झाला आहे.शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी सरकार या क्षेत्रासाठी विविध योजना सुरू करत आहे. याशिवाय काही राज्यांमध्ये मत्स्यपालनासाठी अनुदानही दिले जाते.

कोळंबी शेतीसाठी, सर्वप्रथम तलावासाठी योग्य जागा निवडणे फार महत्वाचे आहे. ज्या मातीवर तुम्ही तलाव बांधत आहात, ती माती चिकणमाती असावी हे लक्षात ठेवा. तसेच ही गोष्ट लक्षात ठेवा की तलावाचे पाणी पूर्णपणे प्रदूषणमुक्त असावे आणि माती कार्बोनेट, क्लोराइड, सल्फेट यांसारख्या हानिकारक घटकांपासून मुक्त असावी. तलावाच्या पाण्याचे मूल्य राखण्यासाठी चुना वापरत रहा. याशिवाय तलावातील पाणी भरण्याची व त्याचा निचरा करण्याची योग्य व्यवस्था असावी. कोळंबी संगोपनासाठी तलावातील रोपवाटिका प्रथम तयार केली जाते. पण त्याआधी कोळंबीच्या बिया काढण्याची प्रक्रिया पूर्ण करणे अत्यंत आवश्यक आहे. सर्वप्रथम, कोळंबीच्या बियांची सर्व पाकिटे तलावातील पाण्याने भरून १५ मिनिटे ठेवावीत,जेणेकरून पॅकेटचे पाणी आणि तलावाचे पाणी यांचे तापमान एक होईल. यानंतर ते लहान खड्डे किंवा स्टोरेजसाठी ठिकाणी सोडले जातात. जेव्हा ही कोळंबी ३ ते ४ ग्रॅमपर्यंत पोहोचते तेव्हा ते अतिशय काळजीपूर्वक हातात घेऊन मुख्य तलावात टाकावे. तलावात आणलेल्या कोळंबीपैकी फक्त ५० ते ७० टक्के कोळंबी जगतात. साधारण ५-६ महिन्यांत ते व्यवस्थित विकसित होते. अशा स्थितीत ते तलावातून काढण्यास सुरुवात करावी. एक एकर पाण्यात २-३ लाखांपर्यंतचा नफा सहज मिळू शकतो, असे कृषी तज्ज्ञ सांगतात.

## गारपीटग्रस्त डाळिंब बागांचे नुकसान, असे करा प्रभावी व्यवस्थापन

अवकाळी पाऊस आणि गारपिटीमुळे डाळिंब बागेत तेल्या, कुजवा व बुरशीजन्य रोगांचा धोका वाढतो. प्रादुर्भावित, इजा झालेल्या फुलकळ्या किंवा फळे काढून टाकावीत. शिफारशीप्रमाणे फवारणी, अन्नद्रव्य व्यवस्थापन करावे. अधिक फुल आणि फळधारणेसाठी थोडीशी वाट पहावी. समाधानकारक फुले व फळधारणा दिसल्यास शिफारशीप्रमाणे एकात्मिक रोग-कीड व्यवस्थापन करून बहर चालू ठेवावा. अन्यथा बाग विश्रांतीवर ठेवावी. पुढील पीक हंगामासाठी, बहराची तयारी करावी.

सर्व फळांचे नुकसान, फांद्या तुटणे/ चिरणे : सर्व नुकसानग्रस्त फळे काढावीत. तुटलेल्या, चिरलेल्या फांद्या छाटून बागेबाहेर खड्ड्यामध्ये कुजण्यासाठी टाकाव्यात. छाटलेल्या फांद्या, खोडांवर बोर्डो पेस्ट लावावी. त्यानंतर १% बोर्डो मिश्रणाची फवारणी करावी. खतांचा हलका डोस भरून बागेला विश्रांती अवस्थेत ठेवावे.

लिंबू आकाराची फळे : ७५% फळांचे गारपीट, पावसामुळे नुकसान झाले असल्यास झाडावरील सर्व फळे काढून टाकावीत. शिफारसीप्रमाणे पुढील बहराची तयारी करावी. २५% किंवा कमी प्रमाणात फळांचे नुकसान झालेले असल्यास बाधित फळे काढून टाकावीत. शिफारशी प्रमाणे फवारणी अन्नद्रव्य व्यवस्थापन करावे.

तोडणी साठी तयार फळे : गारपिटीमुळे फळांना इजा झालेली असल्यास बोरिक ॲसिड २ ग्रॅम प्रतिलिटर पाणी याप्रमाणे संरक्षणात्मक फवारणी घ्यावी. तोडणीसाठी तयार, न कुजलेल्या फळांची काढणी करावी. ती तात्काळ विक्रीसाठी पाठवावीत. चिरलेली, नुकसानग्रस्त, कुजलेली फळे एकत्रित करून कंपोस्ट खड्ड्यात टाकावीत.

विश्रांती अवस्थेतील बाग :सर्व नुकसानग्रस्त, तुटलेल्या, चिरलेल्या फांद्या छाटाव्यात. बागेबाहेर खड्ड्यामध्ये कुजण्यासाठी टाकाव्यात. छाटलेल्या फांद्यांना, खोडांवर बोर्डो पेस्ट लावावी. त्यानंतर १% बोर्डो मिश्रणाची फवारणी करावी. विश्रांती अवस्थेत खत व्यवस्थापन केले नसल्यास खतांचा डोस देऊन घ्यावा. शिफारशी प्रमाणे विश्रांती अवस्थेतील एकात्मिक रोग-कीड व्यवस्थापन करावे.



## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१८३८ : 'द ग्रेट वेस्टर्न' हे वाफेचे इंजिन असलेले जहाज इंग्लंडमधील ब्रिस्टॉल येथून निघून पंधरा दिवसांनी न्यूयॉर्क येथे पोचले. अटलांटिक महासागर पार करणारी ही पहिली आगबोट.
१९११ : डच भौतिकशास्त्रज्ञ हाइक ओन्नेस यांनी अतिसंवाहकतेचा शोध लावला.
१९२१ : आचार्य विनोबा भावे यांनी पवनार आश्रमाची स्थापना वर्धा येथे केली.
१९२९ : भगतसिंग व बटुकेश्वर दत्त यांनी दिल्लीतील सेंट्रल असेंब्लीत बॉम्बस्फोट केला.
१९५० : भारत आणि पाकिस्तान यांच्या लियाकत-नेहरू करारावर स्वाक्षऱ्या.
१९९३ : मॅसेडोनियाचे प्रजासत्ताक संयुक्त राष्ट्रात सामील झाले
२००५ : पोप जॉन पॉल (दुसरे) यांच्या अंत्ययात्रेत अंदाजे ४० लाख लोक सहभागी झाले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१३३६ : तैमूरलंग - मंगोलियाचा राजा (मृत्यू: १४ फेब्रुवारी १४०५)
१९२२ : 'गायनाचार्य' पं. भास्करबुवा बखले - ग्वाल्हेर घराण्याचे प्रतिभावान गायक, बालगंधर्व आणि मास्टर कृष्णराव यांचे गुरू, 'भारत गायन समाज' या संस्थेचे संस्थापक (मृत्यू: १७ आक्टोबर १८६९)
१९२४ : शिवपुत्र सिद्धरामय्या कोमकलीमठ ऊर्फ 'कुमार गंधर्व' (मृत्यू: १२ जानेवारी १९९२)
१९२८ : रणजित देसाई - नामवंत मराठी साहित्यिक, 'स्वामी'कार (मृत्यू: ६ मार्च १९९२)
१९३८ : कोफी अन्नान - संयुक्त राष्ट्रांचे चे ७ वे प्रधान सचिव
१९७९ : भारतीय गायक-गीतकार अमित त्रिवेदी यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८५७ : १८५७ च्या स्वातंत्र्यसंग्रामची सुरूवात करणारा मंगल पांडे याला फाशी देण्यात आले. चैत्र शु. १४ (जन्म: १९ जुलै १८२७)
१८९४ : बंकिमचंद्र चट्टोपाध्याय - बंगाली कादंबरीकार, कवी, लेखक आणि पत्रकार. त्यांनी लिहिलेल्या 'आनंदमठ' या कादंबरीत 'वंदे मातरम' हे गीत असून या गीताने स्वातंत्र्यलढ्यातील सहभागींना प्रेरणा मिळाली. (जन्म: २७ जून १८३८)
१८९४ : बंकिमचंद्र चट्टोपाध्याय, सुप्रसिध्द बंगाली साहित्यिक व 'वंदे मातरम्' या गीताचे रचनाकार.
१९०६ : अल्झायमरच्या आजाराने निदान झालेल्या पहिल्या व्यक्ती एग्स्टे डिटर यांचे निधन. (जन्म: १६ मे १८५०)
१९२२ : 'गायनाचार्य' पं. भास्करबुवा बखले - अष्टपैलू व चतुरस्त्र शैलीचे ग्वाल्हेर घराण्याचे प्रतिभावान गायक, बालगंधर्व आणि मास्टर कृष्णराव यांचे गुरू, 'भारत गायन समाज' या संस्थेचे संस्थापक (जन्म: १७ आक्टोबर १८६९)
१९५३ : वालचंद हिराचंद दोशी - उद्योगपती (जन्म: २३ नोव्हेंबर १८८२)
१९५८ : पाब्लो पिकासो - स्पॅनिश चित्रकार आणि शिल्पकार (जन्म: २५ आक्टोबर १८८१)
१९७४ : नटवर्य गोपाळ गोविंद ऊर्फ नानासाहेब फाटक - मर्दानी रुप, तिन्ही सप्तकांतुन सहजपणे फिरणारा आवाज या देणग्या लाभलेले व गंधर्वयुगाची स्मृती जागवणारे रंगभूमीवरील कलाकार (जन्म: २४ जून १८९९)
१९९९ : वसंत खानोलकर - कामगार नेते, समाजवादी चळवळीतील एक अग्रणी, नर्मदा बचाव आंदोलनाच्या मेधा पाटकर यांचे वडील.
२०१३ : मार्गारेट थॅचर - ब्रिटनच्या एकमेव महिला पंतप्रधान (जन्म: १३ आक्टोबर १९२५)
२०१५ : भारतीय पत्रकार आणि लेखक जयकानधन यांचे निधन. (जन्म: २४ एप्रिल १९३४).

# नवीन फळबागेचे नियोजन : जाणून घ्या योग्य पद्धत

राज्यामध्ये सन १९९०-९१ पासून रोजगार हमी अंतर्गत १०० टक्के अनुदानित फळझाड लागवड ही महत्त्वाकांक्षी योजना सुरु केली तेंव्हापासून फळबाग लागवडीची संकल्पना राज्यातील शेतकऱ्यांच्या मनावर रुजली. फळबाग लागवडीची संकल्पना राज्यातील पडीक जमिनीला मिळालेले वरदान ठरेल, असे म्हटल तर वावग ठरू नये. राज्यात आता पर्यंत ४० लाख हेक्टरहून अधिक क्षेत्रावर फळबागा उभ्या आहेत. परंतु अद्याप फळबाग लागवडीमध्ये अपेक्षित असे यश मिळालेले नाही ही वस्तूस्थिती आहे. अशा परिस्थितीत फळबाग लागवड यशस्वी होण्यासाठी फळबाग लागवडीची पूर्वतयारी आणि नियोजन या महत्वाच्या बाबी आहेत.

यशस्वी लागवडीकरिता महत्वाच्या बाबी : आपल्याकडे जमीन कोणत्या प्रकारची आहे? या जमिनीत फळझाडे येतील का. बारमाही पाण्याची व्यवस्था आपल्याकडे आहे का? आपल्या हवामानात फळझाडे कोणत्या प्रकारची येऊ शकतील? मातीची व पाण्याची तपासणी केली आहे काय? बागेसाठी उत्तम जातीवंत कलमे कोठून उपलब्ध होऊ शकतील? जी बाग आपण लावणार आहोत त्यास बाजारपेठ उपलब्ध आहे काय? प्रक्रिया उद्योग आहेत काय? अशा सर्व बाबींचा विचार केल्यानंतरच आपणास कोणती फळझाडे लावायला हवीत याचा विचार करणे महत्वाचे ठरते.

योग्य नियोजनांची नितांत आवश्यकता : फळबाग म्हणजे ५ ते ६ महिन्याच्या पिकांच्या मशागतीची गोष्ट नसते, तो एक दिर्घकाळ चालणारा व्यवसायाच म्हणायला हरकत नाही.



एकदा त्यात पडले की थांबुन चालत नाही. अनेक वर्ष सातत्याने व चिकाटीने बागेचे फलोत्पादन हाती येईपर्यंत कष्ट करावे लागतात, मेहनत घ्यावी लागते. घामही गाळावा लागतो. कधी कधी पैसा अपुरा पडतो. पाणी पुरत नाही. भावनेच्या भरात एखादी बाग करावयाची ठरविले जाते आणि मग धाडस निभाविता येत नाही. सगळा पसारा अर्ध्यावर सोडावा लागतो. त्यामुळे केलेल्या कष्टाची पैशाची, अनाठायी नासाडी होते. त्यामुळे फळबाग लागवड करण्यापूर्वी योग्य नियोजनांची नितांत आवश्यकता असते.फळबागेसाठी जमिनीची निवड : आपली जमीन कोणत्या प्रकारची आहे, हलकी, मध्यम की भारी हे सर्वांना परिचित असतेच. जर माहिती नसेल तर माहिती करून घ्यावी. जमिनीची खोली किती आहे? जमिनीच्या खाली मुरूम किती खोलीवर आहे? जमिनीचा निचरा कसा आहे? त्याचा अभ्यास करूनच फळबाग निवडावी. फळबागेसाठी जमिनीची निवड करताना तिचा निचरा उत्तम असणे आवश्यक आहे. फळबागेसाठी कमीत कमी १ मीटर खोलीनंतर मुरमाचा थर असणारी जमिन निवडावी. भरपूर सेंद्रिय कर्ब असणारी, भुसभुशीत,मध्यम पोताची जमिनीचा सामू ६ ते ७.५ पर्यंत असावा. मुक्त चुनखडीचे प्रमाण १० टक्क्यापेक्षा कमी असावे. जमिनीचा उतार २ ते ३ टक्क्यापेक्षा जास्त नसावा. ज्या ठिकाणी फळबाग लावायची आहे,त्या ठिकाणच्या मातीचे परिक्षण करून घेणे आवश्यक आहे.

हवामानानुसार फळपिकांची लागवड : महाराष्ट्रातील शेतकरी या बाबतीत खरोखरच भाग्यवान आहेत, कारण आपल्या राज्यात सफरचंद वगळता बहुतेक फळझाडांची यशस्वी लागवड करता येते. कारण आपल्या राज्यातील हवामान फळबाग लागवडीसाठी खुपच अनुकूल आहे, यामुळे हवामांनाच्या बाबतीत फळबाग लागवड करताना शेतकऱ्यांना फारसा विचार करावा लागत नाही. आपल्या राज्याचा विचार करता पश्चिम महाराष्ट्रात आंबा, केळी, चिकू, पपई, नारळ अशा प्रकारची फळझाडे घ्यावीत. पूर्वेकडील उष्ण व कोरड्या हवामानात संत्रा, मोसंबी, कागदी लिंबू, पेरू, द्राक्षे, डाळिंब यासारखी फळझाडे घ्यावीत. कोकणसारख्या अति पावसाच्या भागात चिकू, नारळ, फणस, आंबा काजू यासारखी फळझाडे घ्यावीत.अति कमी पावसाच्या भागात बोर, सीताफळ, आवळा, चिंच अशी कोरडवाहू फळझाडे घ्यावी.

फळबाग यशस्वी करण्यासाठी महत्वाच्या टिप्स : जमिनीची निवड,हवामानानुसार फळझाडांची लागवड,पाण्याची उपलब्धता,फळबागेची आखणी, योग्य कलमांची निवड, लागवडीची योग्य वेळ आणि लागवड केलेल्या रोपांची काळजी,या सर्व बाबी लक्षात घेऊन योग्य नियोजन केल्यासं फळबाग नक्कीच फायद्याची ठरेल.अत्याधुनिक तंत्रज्ञान,व्यापक दुरद्रष्टी, उच्चध्येये, ती प्रत्यक्ष साकारण्यासाठी प्रयत्न अभ्यासाची पराकाष्टा, उद्योजक वृत्ती या बाबी केंद्रस्थानी ठेवल्या तर निश्चितच आपली फळबाग रोल मॉडेल्? ठरेल यात शंका नाही.

## भाव पडल्याने शेतकऱ्याने टोमॅटोच्या शेतात घातली गुरे

तुमसर / प्रतिनिधी



घाम गाळून पीक उभे केले, पण नशिबाने साथ दिली नाही. बाजारातही भाव मिळत नाही. टोमॅटोचे दर मातीमोल झाल्याने आणि तोडणीचा खर्चही खिशातून भरावा लागत असल्याने, उद्विग्न झालेल्या या शेतकऱ्याने आपल्या उभ्या टोमॅटोच्या शेतात चक्क गुरे सोडून दिली. ही हृदयद्रावक अवस्था आहे तुमसर तालुक्यातील तामसवाडी (सिहोरा) येथील शेतकरी चुन्नीलाल बारबैले यांची.

गत काही दिवसांपासून बाजारपेठेत टोमॅटोची आवक मोठ्या प्रमाणात वाढली आहे. परिणामी, घाऊक बाजारात टोमॅटोचे दर कोसळले आहेत. व्यापाऱ्यांनी ३० किलोच्या कॅरेटसाठी अवघा १५० रुपये दर दिला, म्हणजेच फक्त ५ रुपये प्रति किलो. चिल्लर बाजारातही हीच स्थिती असल्याने शेतकऱ्यांच्या हाती काहीच उरताना दिसत नाही. यामुळे शेतकरी चुन्नीलाल बारबैले यांनी टोमॅटोच्या उभ्या पिकात गुरे सोंडून दिली. शेतकऱ्याने घेतलेला हा निर्णय प्रशासकीय उदासीनतेवर आसूड ओढणारा आहे. शेतकरी वाचवाच्या घोषणा दिल्या जात असताना, प्रत्यक्षात जेव्हा बळीराजा संकटात असतो, तेव्हा त्याला कोणताही आधार मिळत नाही. टोमॅटोच्या शेतात गुरे चरीत असलेले दृश्य तुमसर तालुक्यातील भाजीपाला उत्पादक शेतकऱ्यांच्या भीषण वास्तवाची जाणीव करून देणारे आहे. आता तरी शासन आणि कृषी विभाग याकडे लक्ष देऊन शेतकऱ्यांना दिलासा देणार का, असा प्रश्न उपस्थित होतो. शेतकऱ्यांच्या मते, टोमॅटो तोडण्यासाठी मजुरांना द्यावे लागणारे पैसे आणि वाहतुकीचा खर्च मिळून जेवढी रक्कम होते, त्यापेक्षा कमी उत्पन्न विक्रीतून मिळत आहे. त्यातच गत तीन दिवसांपासून झालेल्या अवकाळी पावसामुळे पिकाचे अतोनात नुकसान झाले आहे. हाताशी आलेला घास निसर्गाने हिरावला आणि उरलासुरला बाजाराने खाल्ला, अशी भावना येथील शेतकरी व्यक्त करत आहेत.

मंगळवार दि.७ एप्रिल २०२६ ५

राज्य लोकतंत्र
मराठवाडा वृत्तांत





# मैदान गाजवले, मनेही जिंकली; महसूल क्रीडा स्पर्धेत जालना जिल्ह्याचा डंका

## जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या प्रत्यक्ष सहभागाने खेळाडूंमध्ये संचारले नवचैतन्य; टेबल टेनिसच्या मैदानात जिल्हाधिकाऱ्यांची फटकेबाजी

जालना। प्रतिनिधी

परभणी येथील वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाच्या अश्ववेध मैदानावर आयोजित 'छत्रपती संभाजीनगर विभागीय महसूल क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धा' जालन्याच्या अष्टपैलू कामगिरीने गाजली. दि.३ ते ५ एप्रिल २०२६ दरम्यान पार पडलेल्या या स्पर्धेत जालना जिल्ह्याने केवळ मैदानी खेळातच नव्हे, तर सांस्कृतिक कार्यक्रमातही बाजी मारत प्रेक्षक आणि परीक्षकांची मने जिंकली. रविवार दि.५ एप्रिल २०२६ रोजी रात्री उशिरापर्यंत चाललेल्या पारितोषिक वितरण समारंभात जालना जिल्ह्याला विभागीय सर्वसाधारण चॅम्पियनशिपमध्ये द्वितीय उपविजेता म्हणून गौरविण्यात आले.

जालना जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी या स्पर्धेदरम्यान वेळोवेळी स्वतः मैदानावर उपस्थित राहून खेळाडूंचा उत्साह वाढविला. त्यांच्या प्रत्यक्ष उपस्थितीमुळे खेळाडूंमध्ये एक वेगळेच नवचैतन्य संचारले होते. जिल्हाधिकाऱ्यांच्या या प्रोत्साहनामुळेच खेळाडूंनी आपले सर्वस्व पणाला लावून विविध खेळांमध्ये विजयश्री खेचून आणला.




या स्पर्धेचे मुख्य आकर्षण ठरले ते म्हणजे जालना जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांचा खेळातील प्रत्यक्ष सहभाग. केवळ मार्गदर्शक म्हणून न थांबता, जिल्हाधिकारी मित्तल स्वतः टेबल टेनिसच्या मैदानात उतरल्या. त्यांनी हाती बॅट घेत चपळाईने केलेले सर्व्हिस आणि स्मॅश पाहून उपस्थितांनी टाळ्यांचा कडकडाट केला. त्यांच्या या स्पोर्ट्समन स्पिरीटमुळे जालना संघातील खेळाडूंमध्ये वेगळेच नवचैतन्य निर्माण झाले. केवळ प्रशासकीय कामातच नव्हे, तर खेळाच्या मैदानातही आपण तितकेच तत्पर आहोत, हे त्यांनी टेबल टेनिसच्या स्पर्धेत उतरून दाखवून दिले. प्रशासकीय जबाबदाऱ्या सांभाळतानाच खेळाप्रती असलेली त्यांची ही ओढ खेळाडूंसाठी प्रेरणादायी ठरली. त्याच बरोबर जालना महसूल विभागातील अपर जिल्हाधिकारी रमेश मिसाळ आणि निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल सांघिक क्रीडा प्रकारात विजयी ठरले असून इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांनी देखील क्रीडा स्पर्धेत सहभाग घेत विजयाचा पाया रचला आहे.

केवळ मैदानी खेळातच नव्हे, तर सांस्कृतिक व्यासपीठावरही जालना जिल्ह्याने आपली छाप पाडली. सांस्कृतिक कार्यक्रमात जालन्याच्या चमूने सादर केलेल्या कलाविष्काराला उपस्थितांनी उत्स्फूर्त दाद दिली. महसूल विभागातील अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या या कलागुणांचे सर्वत्र कौतुक होत आहे. जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या मार्गदर्शनाखाली जालना जिल्ह्याचा संघ या विभागीय क्रीडा स्पर्धेत सातत्यपूर्ण कामगिरी करत विविध स्पर्धा प्रकारात जालन्याचे नाव उंचावले आहे. जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी सर्व कलाकार, खेळाडूंचे कौतुक करत अभिनंदन केले.

वैयक्तिक खेळ प्रकारात बुध्दीबळ प्रथम क्रमांक प्रशांत हरिशचंद्रे, टेबल टेनिस एकेरी प्रथम क्रमांक रवि वैद्य तर दुहेरीत द्वितीय क्रमांक शशिकांत हदगल व रवि वैद्य, बॅडमिंटन दुहेरी द्वितीय क्रमांक कृष्णा मुजमुले व सोमनाथ सर फळे, १०० मिटर धावणे द्वितीय क्रमांक राहुल साळवे, ४०० मिटर धावणे प्रथम क्रमांक योगेश पोटे, उंच उडी प्रथम क्रमांक कृष्णा सोनवणे, गोळा फेक प्रथम क्रमांक राजेश खांडेभराड, थाळी फेक तृतीय क्रमांक प्रकाश जाधव, जलतरण ब्रेस्ट स्ट्रोक प्रथम तर फ्री स्टाईल द्वितीय क्रमांक स्वप्निल चौधरी, जलतरण प्रथम क्रमांक अनिरुध्द झुमडे, ४५ वर्षावरील पुरुष थाळी फेक द्वितीय क्रमांक प्रकाश जाधव, टेबल टेनिस मिश्र प्रथम क्रमांक प्रणाली तायडे व शशिकांत हदगल, ४५ वर्षावरील पुरुष लॉन टेनिस एकेरी सुनिल केंधळे तर दुहेरीत सुनिल केंधळे व रमेश मिसाळ, कॅरम महिला एकेरी द्वितीय क्रमांक सरिता गुंजकर, महिला बॅडमिंटन एकेरी द्वितीय क्रमांक शितल सराटे तर दुहेरी शितल सराटे आणि रश्मी पिलडेकर, १०० मिटर व २०० मिटर धावणे प्रथम क्रमांक मोहिनी कोळसे, ४०० मिटर धावणे प्रथम क्रमांक निता मुळूक, उंच उडी प्रथम क्रमांक तत्पर्ता पाटील, लांब उडी प्रथम क्रमांक मोहिनी कोळसे, गोळा फेक द्वितीय क्रमांक मोहिनी कोळसे, थाळी फेक द्वितीय क्रमांक पुजा चव्हाण, पुरुष सांघिक खेळ प्रकारात ४१०० रिले प्रथम क्रमांक, महिला सांघिक खो खो प्रथम क्रमांक, महिला सांघिक खेळ प्रकारात ४१०० रिले प्रथम क्रमांक तर ४४०० रिले प्रथम क्रमांक पटकाविलेला आहे. याप्रमाणे एकुण २२१ क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धा प्रकारात जालना महसूल विभागातील अधिकारी-कर्मचाऱ्यांनी प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांक पटकाविला आहे.

# बसच्या स्मार्ट कार्डसाठी कोंडी; पैठणला ७००० ज्येष्ठ नागरिकांसाठी एकच केंद्र

## नवीन कार्डासाठी १९९ रुपये, तर जुने कार्ड बदलण्यासाठी १४९ रुपये खर्च



पैठण। प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने प्रवाशांसाठी 'नॅशनल कॉमन मोबिलिटी कार्ड' स्मार्ट कार्ड योजना लागू केली आहे. ज्येष्ठ नागरिकांसह महिला, विद्यार्थी, दिव्यांग प्रवाशांसाठी हे कार्ड अनिवार्य करण्यात आले आहे. कार्ड आधार संलग्न आहे. नवीन कार्डासाठी जीएसटीसह शुल्क १९९ रुपये आहे. जुने कार्ड बदलून नवीन स्मार्ट कार्ड घेणाऱ्यांसाठी १४९ रुपये खर्च निश्चित केला आहे.

राज्यभरातील बसस्थानके आणि ३ हजारांहून अधिक अधिकृत एजंट्समार्फत नोंदणी सुरू आहे. पैठण एसटी स्थानकातही यासाठी एक कक्ष तयार केला आहे. येथे १९९ ऐवजी ३०० रुपये आकारले जात असल्याचा आरोप आहे. या स्मार्ट कार्डमुळे सवलतीचा प्रवास अधिक पारदर्शक, सुलभ होणार आहे. ७५ वर्षांवरील नागरिकांना मोफत प्रवासाची सुविधा याच कार्डद्वारे मिळणार आहे. इतर वयोगटांनाही सवलतीचा लाभ डिजिटल पद्धतीने मिळेल. हे कार्ड प्रीपेड वॉलेटप्रमाणे काम करणार आहे. प्रवासी रिचार्ज करून तिकीट व्यवहार करू लूट थांबवा, अन्यथा धडा शिकवू : राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष जितू परदेशी, बजरंग लिंबोरे म्हणाले की, ज्येष्ठ नागरिकांना अडवून ठेवू नका. कार्डसाठीचे अडथळे दूर करा. केंद्र वाढवा, कोणत्याही प्रकारची लूट करू नका, अन्यथा आमच्या स्टाइलने धडा शिकवला जाईल, असे त्यांनी सांगितले. तक्रार करा, कारवाई करू

आगारप्रमुख मडके आगारप्रमुख गजानन मडके यांनी स्मार्ट कार्ड आवश्यक असल्याचे सांगितले. दर १९९ रुपये असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. मात्र ३०० रुपये घेतले जात असल्याच्या तक्रारीवर ते म्हणाले, लूट होत असेल तर कारवाई करू, यासाठी ज्येष्ठांनी तक्रार करावी. तत्काळ कारवाई केली जाईल. पैठण बसस्थानकात ज्येष्ठ नागरिकांची होत असलेली गर्दी. शकतील. रोख व्यवहार कमी होणार आहे. वेळेची बचत होणार आहे. पैठण तालुक्यात साधारण ७ ते ९ हजार ज्येष्ठ नागरिक एसटीने प्रवास करतात. या सर्वांना कार्ड आवश्यक आहे. तालुक्यात कार्डसाठी एकच केंद्र आहे. येथे दररोज केवळ १०० ज्येष्ठांची नोंद असल्याने अनेकांना परत जावे लागते. प्रत्येक मोठ्या सर्कलमध्ये कार्ड सेंटर सुरू करण्याची मागणी ज्येष्ठ नागरिक संघटनेने केली आहे. नोंदणीसाठी आधार कार्ड अनिवार्य आहे. वयाचा पुरावा आवश्यक असून आधार किंवा पॅन कार्ड व फोटोही आवश्यक आहे.

# दहावी, बारावीच्या परीक्षांमध्ये एआय प्रॉक्टर कॅमेऱ्याचा प्रयोग; गैरप्रकारांवर प्रभावी नियंत्रण

जालना। प्रतिनिधी

परीक्षांमधील सामूहिक कॉपी व इतर गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी जिल्हाधिकारी अशिमा मित्तल यांच्या सूचनेनुसार जिल्हा प्रशासनाने यंदा प्रथमच चाय लॅब्स इनोव्हेशन्स एलएलपी आणि सोशल पिल यांच्या तंत्रिक साह्याने कृत्रिम बुद्धिमत्ता (ए.आय.) आधारित प्रॉक्टर कॅमेरा प्रणालीचा अभिनव प्रयोग केला. या प्रयोगाने सामूहिक गैरप्रकारांना काही प्रमाणात आळा बसण्यासह अत्यंत सकारात्मक परिणाम दिसून आले आहेत. दि. २० फेब्रुवारी ते १८ मार्च दरम्यान घेण्यात आलेल्या इयत्ता १०वी व १२वी बोर्ड परीक्षांमध्ये जिल्ह्यातील पाच संवेदनशील परीक्षा केंद्रांवर ५० ए.आय. सक्षम सीसीटीव्ही कॅमेरे परीक्षा सुरू



होण्यापूर्वीच बसविण्यात आले होते प्रायोगिक तत्त्वावर राबविण्यात आलेल्या प्रकल्पात कॅमेर्यांमध्ये प्रगत विश्लेषण क्षमता (डव्हान्स नलिसिसीस) बसविण्यात

आल्याने परीक्षेदरम्यान विद्यार्थ्यांच्या हालचालींवर बारकाईने लक्ष ठेवणे शक्य झाले. ए. आय. प्रणालीद्वारे संशयास्पद हालचाली, गटाने बसून कॉपी करण्याचा प्रयत्न, वारंवार इकडे-तिकडे पाहणे, अनधिकृत वस्तूंचा वापर यांसारख्या बाबींची तातडीने वेळेवर ओळख करण्यात आली. प्रत्येक संशयास्पद घट ने वर त्वरित अलर्ट प्रणाली द्वारे संबंधित अधिकाऱ्यांना सूचना देण्यात. आल्या. ज्यामुळे तातडीने हस्तक्षेप करून गैरप्रकार रोखणे शक्य झाले. तसेच परीक्षांमध्ये पारदर्शकता, शिस्त आणि प्रामाणिकपणा मोठ्या प्रमाणात वाढल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले. विशेष म्हणजे, संवेदनशील केंद्रांवरील गैरप्रकारांमध्ये लक्षणीय घट झाल्याचे ही प्राथमिक निष्कर्षांतून स्पष्ट झाले आहे. संबंधित संस्थांनी भविष्यात या प्रणालीत अधिक सुधारणा करून जिल्ह्यातील सर्व परीक्षा केंद्रांवर टप्प्याटप्प्याने ए.आय. तंत्रज्ञानाचा विस्तार करण्याची तयारी दर्शविली आहे. दरम्यान, जिल्हा प्रशासनाने या उपक्रमाद्वारे केवळ तंत्रज्ञानाचा प्रभावी वापरासोबतच, शिक्षण व्यवस्थेत प्रामाणिकतेला बळकटी देण्याचा महत्त्वपूर्ण संदेश दिला आहे. जालना जिल्ह्याचा हा प्रयोग राज्यातील इतर जिल्ह्यांसाठी मार्गदर्शक ठरण्याची शक्यता शिक्षण तज्ञांनी व्यक्त केली. यासाठी लोकमान्य टिळक कनिष्ठ महाविद्यालय, सेवली, श्रीमती इंदिरा गांधी उच्च मध्यमिक विद्यालय, रामनगर (सा.का.), कला वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय, बदनापूर, सिध्देश्वर उच्च माध्यमिक शाळा, (ढोकसाळ, ता. मंठा), पाथ्रीकर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, बदनापूर या केंद्रावर यशस्वी प्रयोग करण्यात आला.

# जयदत्त धस टेंभुर्णी येथे अवकाळी पावसाने नुकसान झालेल्या पीडित शेतकऱ्यांच्या भेटीला

पाथर्डी। प्रतिनिधी

३१ मार्च ते २ एप्रिल पर्यंत पाथर्डी तालुक्यासह बीड जिल्ह्याच्या काही भागात विजेच्या कडकडासह वादळी वाऱ्यासह पाऊस झाल्याने शिरूर कासार तालुक्यातील टेंभुर्णी गावातील शेतकऱ्यांच्या शेतातील काढणीला आलेला गहू उन्हाळी बाजरी भुईमूग या पिकांचे अतोनात नुकसान झाले या संदर्भात टेंभुर्णी गावचे सरपंच मिथुन डोंगरे यांनी तातडीने यामुळे आष्टी पाटोदा शिरूर मतदार संघाचे आमदार सुरेश धस यांच्याकडे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या प्रश्नासंदर्भात लक्ष वेधले असतात.

आ.सुरेश धस यांचे चिरंजीव जयदत्त



धस हे ६ एप्रिल रोजी शिरूर कासार तालुक्यातील टेंभुर्णी गावच्या दौऱ्यावर आले असता त्यांनी पीडित शेतकऱ्यांच्या भेटी घेतल्या व प्रशासनास तात्काळ पंचनामे करून शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान झाले त्याची नुकसान भरपाई देण्याची मागणी शासनाकडे केली आहे टेंभुर्णी गावातील वादळी पावसामध्ये विज पडून विजेचा शॉंक लागुन यशोदा अमोल शिरसाट यांचा दुर्दैवी म्रृत्यु झाला तसेच गावातील रुस्तुम रामभाऊ यांचा दोन लाख रुपये किमतीचा बैल अंगावर विज पडून मृत्युमुखी पडला या पीडित कुटुंबांना जयदत्त धस यांनी भेटी देत त्यांचे सांत्वन केले यावेळी सरपंच व शिक्षक नेते मिथुन डोंगरे गौतम पारखे महावितरणचे शाखा अभियंता शेळके लाईमन रोंडे जाधव कामगार तलाठी तसेच भीमा शिरसाट पांडूरंग शिरसाट सर्जेराव शिरसाट बाळू शिरसाट शहादेव शिरसाट शिवनाथ शिरसाट गणेश शिरसाट इत्यादी मंडळी उपस्थित होती.

# राहुरी विधानसभा मतदारसंघात शिवसेना शिंदे गटाकडून बंडखोरी

## रवी मोरे यांनी उमेदवारी अर्ज भरला; भाजपवर केली सडकून टीका

अहिल्यानगर। प्रतिनिधी

महाराष्ट्रात दोन मतदारसंघात पोटनिवडणुका होणार असून त्यासाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा आजचा शेवटचा दिवस आहे. या पार्श्वभूमीवर बारामती विधानसभा मतदारसंघातून दिवंगत नेते व राज्याचे माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांनी उमेदवारी अर्ज भरला आहे. तर राहुरी मतदारसंघात भाजपचे अक्षय कर्डिले यांना उमेदवारी देण्यात आली आहे. बारामती प्रमाणेच राहुरीतही बिनविरोध निवडणूक व्हावी यासाठी महायुतीकडून प्रयत्न सुरू होते. मात्र राहुरीत शिवसेना शिंदे गटाकडूनच बंडखोरी झाल्याचे समोर आले आहे. अहिल्यानगर जिल्ह्यातील राहुरी विधानसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीत आता राजकीय ट्विस्ट आला असून, शिवसेना शिंदे गटाच्या



शेतकरी सेनेचे पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष रवी मोरे यांनी आपला अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. मतदारसंघातील शेतकऱ्यांच्या ज्वलंत प्रश्नांना विधानसभेत प्रभावीपणे मांडण्यासाठी खुद्द शेतकऱ्यांनीच आग्रह धरल्यामुळे आपण निवडणुकीच्या रिंगणात उतरल्याचे मोरे यांनी अर्ज भरल्यानंतर स्पष्ट केले.

यावेळी महायुतीच्या युती धर्माबाबत विचारले असता मोरे यांनी भाजपवर जोरदार निशाणा साधला. राहुरी नगरपरिषद आणि स्थानिक कारखान्याच्या निवडणुकीत भाजपने शिंदे गटाला कधीही विश्वासात घेतले नाही, मग आम्ही तरी त्यांचा विचार का करावा, असा रोखठोक सवाल त्यांनी उपस्थित केला. त्यामुळे बारामतीमध्ये महायुतीत एकवाक्यता दिसत असली तरी, राहुरीत मात्र शिंदे गटाच्या पदाधिकाऱ्यानेच बंडखोरीचे निशाण फडकावल्याने महायुतीसमोर मोठे आव्हान उभे राहिले आहे. तर दुसरीकडे राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीसाठी शरद पवार गटाकडून प्राजक्त तनपुरे यांचे नाव आघाडीवर असताना आणि ठाकरे गटानेही या जागेवर दावा केला असताना, अचानक घडलेल्या नाट्यमय घडामोडींनी राजकीय चित्र बदलले आहे. भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण आणि मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी सोमवारी सकाळी तनपुरे यांची भेट घेऊन त्यांच्याशी बंद दाराआड चर्चा केली, ज्यामध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी फोनवरून संवाद साधून दिल्याचे समजते. या मध्यस्थीनंतर प्राजक्त तनपुरे आता निवडणुकीच्या रिंगणातून माघार घेण्याची दाट शक्यता वर्तवली जात आहे. शरद पवार गटाने दोन 'एबी' फॉर्म पाठवले असून, त्यात प्राजक्त तनपुरे आणि गोविंदराव मोकाटे यांच्या नावाचा समावेश आहे. जर काही कारणास्तव प्राजक्त तनपुरे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला नाही, तर पक्षाचे अधिकृत उमेदवार म्हणून गोविंदराव मोकाटे रिंगणात उतरतील, हे आता स्पष्ट झाले आहे. पक्षाकडून लवकरच अधिकृत उमेदवाराची घोषणा केली जाणार असून, या आक्रमक पवित्र्यामुळे राहुरीची निवडणूक बिनविरोध होण्याची शक्यता मावळली असून तिथे आता प्रत्यक्ष लढत होणार असल्याचे जवळपास निश्चित मानले जात आहे.

# तापमानामुळे काळ्या, लाल मातीच्या माठांना मागणी

मंठा। प्रतिनिधी

उन्हाची तीव्रता वाढू लागल्याने थंडगार पाण्यासाठी मातीच्या माठांची मागणी वाढली आहे. काही दिवस वातावरणात गारवा होता. आता एप्रिलच्या मध्यावर पुन्हा उन्हाचे चटके जाणवू लागले आहेत. या पार्श्वभूमीवर स्थानिक काळे माठ, विविध बनावटीचे आकर्षक माठ बाजारात आले आहेत. मंठा बाजारपेठेत काळे माठ २०० रुपयांना मिळत आहेत. परराज्यातील माठ ३०० ते ५०० रुपयांपर्यंत विकले जात आहेत. एप्रिल सुरू होताच उकाडा वाढला. नंतर बदलत्या वातावरणामुळे काही दिवस गारवा वाढला. आता पुन्हा उन्हाचा तडाखा वाढला आहे. नागरिक थंड पाण्याकडे वळले आहेत. मातीचा माठ हे विना-इंधन पाणी शीतल करण्याचे सहज साधन आहे. त्यामुळे मागणी वाढली आहे. मंठा तालुक्यातील शहरांसह गावांच्या गल्लीबोळात माठ विक्रेते दिसू लागले आहेत. स्थानिक माठांसोबत राजस्थान, गुजरात येथील माठही विक्रीला आहेत.

बहुतांश नागरिक, ज्येष्ठ नागरिक फ्रिजचे, जारचे थंड पाणी पीत नाहीत. ते पारंपारिक माठाला पसंती देतात. मातीचा माठ 'गरिबाचा फ्रिज' म्हणून ओळखला जातो. उन्हाच्या झळा सुरू झाल्यावर माठातील पाणी गार मिळते. काही जण मागच्या वर्षीचा माठ बाहेर काढतात. तो पुसून स्वच्छ करतात. मग वापरतात. काही जण नवीन माठ घेतात. मागील काही वर्षांपासून राजस्थानी माठ फेरीवाल्यांमार्फत दारात येतात. व्यापाऱ्यांकडेही मिळतात. आठवडी बाजारात लाल, काळ्या मातीचे माठ सहज उपलब्ध आहेत. परराज्यातील माठासाठी वापरली जाणारी माती कमी जाडीची असते. झिरपणेही कमी असते. त्यामुळे पाण्याला हवा तेवढा गारवा मिळत नाही.

दैनिक
राज्य लोकतंत्र
मंगळवार दि.०७ एप्रिल २०२६ | ६

# चार हॉस्पिटल चालकांना लाखोंचा दंड

## कुठेही चुकीचे काम आढळून आल्यास फौजदारी कारवाई -डॉ.ओमप्रकाश शेटे

बीड । प्रतिनिधी

आयुष्यमान भारत मिशन अंतर्गत आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना आणि महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना रुग्णांच्या उपचारासाठी कल्याणकारी योजना ठरत आहे. १ एप्रिल २०२५ ते ३१ मार्च २०२६ या कालावधीमध्ये बीड जिल्ह्यात ७३ तक्रारी रुग्णांकडून दाखल झाल्या होत्या त्यापैकी ६९ तक्रारी निकाली काढलेले आहेत. यात विशेष करून बीड जिल्ह्यातील चार हॉस्पिटल चालक डॉक्टरांवर रुग्णांकडून औषध आणि इंजेक्शन साठी अतिरिक्त पैसे वसूल केल्याचे उघडकीस आले. या प्रकरणी संबंधित हॉस्पिटल चालक डॉक्टरांना ११ लाख ७८ हजार ५०० रुपयांचा दंड ठोठावला आहे. कुठेही चुकीचे काम आढळून आल्यास फौजदारी कारवाई करण्याचे आदेश आयुष्यमान भारत मिशन समिती महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष डॉ. ओमप्रकाश शेटे यांनी दिले.

महाराष्ट्र शासन आयुष्मान भारत मिशन महाराष्ट्र समिती चे अध्यक्ष डॉ. ओमप्रकाश स. शेटे यांनी जिल्हाधिकारी कार्यालय येथे सोमवार, दिनांक ०६.०४.२०२६ रोजी केंद्र शासनाच्या तसेच राज्य शासनाच्या आयुष्मान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याबाबत आढावा बैठक घेतली. यावेळी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितिन रहमान, अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक नागेश चव्हाण यासह संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते. यानंतर आयोजित पत्रकार परिषदेमध्ये समितीचे अध्यक्ष डॉ. ओमप्रकाश शेटे म्हणाले आयुष्मान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजने अंतर्गत रुग्णांची कोणत्याही हॉस्पिटल अंतर्गत अतिरिक्त पैशाची



वसुली किंवा उपचारांमध्ये कुठेही अडचणी निर्माण होऊ नयेत यासाठी राज्यस्तरावर विशेष यंत्रणा कार्यरत आहे. या यंत्रणेकडे बीड जिल्ह्यातील योजनेअंतर्गत सुरू असलेल्या रुग्णालयांमध्ये उपचार घेणाऱ्या रुग्णांकडून ७३ तक्रारी दाखल झाल्या होत्या त्यापैकी ६९ तक्रारी निकाली काढण्यात आलेल्या आहेत. विशेष करून चार हॉस्पिटल मध्ये रुग्णांकडून औषधे आणि इंजेक्शन खर्च आकारण्यासाठी अतिरिक्त पैशाची वसुली हॉस्पिटल चालक डॉक्टरांकडून करण्यात आल्याचे उघडकीस आले आहे याप्रकरणी संबंधित चारही हॉस्पिटल चालक डॉक्टरांवर रोख रक्कम दंडाची कार्यवाही करण्यात आलेली आहे. बीड जिल्ह्यासह राज्यातील ज्या ज्या रुग्णालयांमध्ये या योजनेच्या माध्यमातून उपचार करण्यात येते या ठिकाणच्या रुग्णालयातील कामकाजावर योजनेच्या विशेष यंत्रणेकडून लक्ष केले जात आहे. रुग्णांच्या तक्रारी नोंदवण्यासाठी ऑनलाईन आणि टोल फ्री क्रमांक जाहीर करण्यात आलेला आहे यामुळे रुग्णांना थेट तक्रारी करण्याची आणि आरोग्य उपचाराच्या संबंधी माहिती देण्याचा अधिकार उपलब्ध करून दिलेला आहे त्यानुसार या योजना अंतर्गत हॉस्पिटल चालक डॉक्टरांवर येणाऱ्या काळात गंभीर तक्रारी आढळून आल्यास थेट फौजदारी कायद्याअंतर्गत कारवाई केली जाईल असेही निर्देश यावेळी त्यांनी दिले.

### बीड जिल्ह्यातील या हॉस्पिटलला दंड

शिवाजीराव हार्ड केअर अँड इमर्जिन सेंटर यांनी एक लाख ८५ हजार रुपये अतिरिक्त पैसे वसुली केल्याचे निदर्शनास आले परिणामी या हॉस्पिटल ला दहा लाख रुपये दंड आकारण्यात आला आहे. मेडिकेअर हार्ट अँड क्रिटिकल केअर हॉस्पिटल या ठिकाणी २६ हजार १४३ रुपये अतिरिक्त पैसे वसुली केल्याचे उघडकीस आले याप्रकरणी एक लाख तीस हजार रुपयांचा दंड आकारण्यात आला आहे. वेलनेस मल्टी स्पेशलिस्ट हॉस्पिटल येथे १ हजार ५००रुपये अतिरिक्त पैसे वसुली झाल्याचे निष्पन्न झाले असून १३ हजार ५०० चा दंड आकारण्यात आला आहे. संजीवनी हॉस्पिटल माजलगाव येथे सात हजार रुपयांचे अतिरिक्त पैसे वसुलीचा प्रकार उघडकीस आला. याप्रकरणी ३६ हजार रुपयांचा दंड करण्यात आला आहे.

# जगदंबा पतसंस्थेची आर्थिक फसवणूक

### न्यायालयात प्रकरण सुरु, बोगस गुंठेवारीद्वारे खरेदीखत तरी उचलले कर्ज

गेवराई । प्रतिनीधी

गेवराई शहरातील तयबनगर मधील सर्वे नंबर १२८/क मधील जागेवर जे विवादित आहे, त्यावर खोट-नाटे, दिशाभूल करुन अमजद पठाण यांनी जगदंबा पतसंस्थाची आर्थिक फसवणूक केली आहे, असे सातबा-याचे अवलोकन केले असता दिसून येत आहे.

सर्वे नं.१२८/क मधील शेख शमीमबी इस्माईल यांना विश्वासात घेवून त्यांची दिशाभूल तसेच अज्ञान व अशिक्षीतपणाचा फायदा घेवून रिजवान इरफान फंगारी याने खोटे-नाटे गुंठेवारीचे कागदपत्रे बनवून आणली व खरेदीखत करुन घेतले, याव्यवहारामध्ये धनादेश दिलेले ते वटले नाहीत, त्यांची काही रक्कम अजून येणे बाकी आहे, खोटे कागदपत्राची माहिती मिळाली असता शेख शमीमबी इस्माईल यांनी तात्काळ खुलासा व नगर परिषदेकडे वेळो-वेळी रितसर तक्रारी अर्ज केले, त्याने नंतर सदरील जागा कार्रवाई पोटी अमजद पठाण नामक व्यक्तीला विक्री केली, अमजद पठाणने नगर परिषदला न जुमानता जागेवर बांधकाम सुरु केले असता न.प. मुख्याधिकारी यांना तकारी अर्जादवारे बांधकाम थांबविण्याचे विनंती केली असता मुख्याधिकारी यांनी संबंधितास बांधकाम थांबवून ७ दिवसात झालेले बांधकाम काढून घेण्यास नोटीस बजावली.तरीही बांधकाम सुरूच आहे.

यानंतर अमजद पठाण याने जगदंबा पतसंस्थाचे रुपये ६ लाखाचे कर्ज प्रकरण करून सर्वे नंबर १२८/क मधील विवादित जागेवर कर्ज उचलेले आहे, असे ७/१२ वरुन दिसून येत आहे, एक प्रकारे अशी कार्रवाई व न्यायालयामध्ये प्रकरण सुरु असतांना कर्ज बँकांकडून देण्यात येत नाही, परंतु सदरील विवादीत जागेची खोटी-नाटी कागदपत्रे सादर करून कर्जदार अमजद पठाण यांनी एकप्रकारे बँकेची दिशाभूल तर केलीच आर्थिक फसवणूक ही केली आहे. याबाबत जगदंबा पतसंस्था या बोगस कागदपत्रेच्या कर्ज प्रकरणी काय भुमिका घेते, हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे.

# सहाल चाऊस लोकांच्या कामासाठी तळमळ करणारा कार्यकर्ता-आ.सोळंके



### मान्यवरांच्या उपस्थितीत माजलगावात ९८.७७ कोटींच्या पाणीपुरवठा योजनेचा शुभारंभ

माजलगाव । प्रतिनिधी

सहाल चाऊस लोकांसाठी तळमळ असणारा शहराच्या विकासासाठी काम करणारा कार्यकर्ता आहे.मी त्यांना नगरपरिषद निवडणूकित पाडण्याचा प्रयत्न केला,परंतु लोकांनी त्यांच्या कामामुळे त्यांना स्वीकारले असे गौरवद्गार आ. प्रकाश सोळंके यांनी काढले.तर योजना अनने म्हणजे विकास नव्हे तर दर्जेदार काम करून घेणे हा विकास आहे.असे मत बहुजन नेते बाबुराव पोटभरे यांनी व्यक्त केले.

मान्यवरांच्या उपस्थितीत माजलगावात ९८.७७ कोटींच्या पाणीपुरवठा योजनेचा शुभारंभ आ.सोळंके यांच्या हस्ते करण्यात आला.महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान अंतर्गत पाणीपुरवठा योजनेच्या जलशुद्धीकरण केंद्र व ४ उंच जलकुंभांच्या भूमिपूजनाचा समारंभ दि.०६ एप्रिल सोमवार रोजी सकाळी १२: ३० वाजता जलशुद्धीकरण केंद्र येथे पार पडला.यावेळी व्यासपीठावर माजी आ.मोहनराव सोळुंके माजी आ.डिके देशमुख, ◀◀ पान ३ वर

# बीड पोलिसांचा संवाद क्यूआर कोड उपक्रम यशस्वी

### चार हजार तक्रारींचे २४ तासांत निवारण



बीड । प्रतिनिधी

बीड जिल्हा पोलीस दलामार्फत नागरिकांच्या तक्रारींचे तात्काळ निवारण करण्यासाठी सुरू करण्यात आलेल्या संवाद क्यूआर कोड प्रकल्पाला जिल्ह्यात मोठा प्रतिसाद मिळत आहे. या उपक्रमांतर्गत आतापर्यंत प्राप्त झालेल्या ४००० तक्रारी आणि फीडबॅकवर पोलिसांनी अवघ्या २४ तासांच्या आत कार्यवाही करून त्यांचे यशस्वी निराकरण केले आहे.

काय आहे संवाद क्यूआर कोड उपक्रम?

नागरिकांना पोलीस ठाण्यात प्रत्यक्ष न जाता आपली तक्रार किंवा सूचना नोंदवता यावी, या उद्देशाने ०६ फेब्रुवारी २०२५ पासून हा उपक्रम राबविला जात आहे. सार्वजनिक ठिकाणे, पोलीस ठाणे परिसर, शासकीय कार्यालये आणि सोशल मीडियावर हे क्यूआर कोड उपलब्ध करून देण्यात आले आहेत. नागरिकांनी आपल्या मोबाईलवरून हा कोड स्कॅन केल्यास ◀◀ पान ३ वर

### पोलीस अधीक्षकांचे आवाहन

बीडचे पोलीस अधीक्षक श्री. नवनीत कावत यांनी नागरिकांना या सुविधेचा जास्तीत जास्त वापर करण्याचे आवाहन केले आहे. ''कोणतीही समस्या, तक्रार किंवा सूचना असल्यास नागरिकांनी निसंकोचपणे क्यूआर कोड स्कॅन करून नोंदवावी. सुरक्षित आणि जबाबदार समाज घडवण्यासाठी नागरिकांचा सहभाग हीच आमची ताकद आहे,'' असे त्यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे नमूद केले आहे.



संतभूमी अर्बन को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीचे चेअरमन अर्जुन राऊत यांचा वाढदिवसानिमित्त सत्कार करताना महात्मा फुले युवा दलाचे संस्थापक अध्यक्ष एड. सतीश शिंदे, दैनिक राज्य लोकतंत्रचे कार्यकारी संपादक सुभाष चौरे, मराठी पत्रकार परिषदेचे जिल्हाध्यक्ष विशाल साळुंके,प्रा. ज्ञानेश्वर राऊत, माऊली शिरसाठ आदी उपस्थित होते.

# भोंदू बाबा अशोक खरातवर कारवाई करा माजलगावमध्ये कम्युनिस्ट पक्षाचे आंदोलन

माजलगाव । प्रतिनिधी

नाशिक जिल्ह्यातील सिन्नर येथील भोंदू बाबा अशोक खरात याने केलेल्या महिलांच्या शोषणाविरोधात आणि त्याला साथ देणाऱ्या लोकप्रतिनिधीं विरोधात दि ०६ एप्रिल सोमवार रोजी भारतीय कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी) तर्फे माजलगाव येथे तीव्र निदर्शने करण्यात आली. यासंदर्भात पोलीस निरीक्षकांना निवेदन देऊन कडक कारवाईची मागणी करण्यात आली आहे.



भोंदू बाबा अशोक खरात याने जादूटोणा आणि अंधश्रद्धेच्या नावाखाली महिलांचे आर्थिक व शारीरिक शोषण केल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. राजकीय कनेक्शन या भोंदूगिरीत राज्यातील ३९ आमदार आणि अनेक बडे अधिकारी सामील असल्याचा खळबळजनक दावा पक्षाने केला असून, त्यांची नावे जाहीर करून त्यांचे राजीनामे घेण्याची मागणी केली आहे.प्रमुख मागण्या अशोक खरातची सर्व मालमत्ता जप्त करून ती अंधश्रद्धा निर्मूलनासाठी वापरावी.सोशल मीडियावर फिरणारे पीडित महिलांचे आक्षेपार्ह व्हिडिओ तातडीने हटवावेत.प्रत्येक पोलीस स्टेशनमध्ये अंधश्रद्धा निर्मूलन कक्ष ◀◀ पान ३ वर

# महापुरुषांच्या अनाधिकृत स्मारकांविरोधात कारवाईसाठी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर लक्ष्यवेधी आंदोलन

बीड । प्रतिनिधी

राज्यात महापुरुषांच्या नावाखाली अनाधिकृत पुतळे व स्मारके उभारण्याचे प्रकार वाढत असून, त्यामुळे सामाजिक सलोखा बिघडून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होत असल्याची गंभीर बाब समोर येत आहे. या पार्श्वभूमीवर दोषींवर कठोर कारवाई करावी आणि शासनाच्या पुतळा धोरणाची काटेकोर अंमलबजावणी करावी, या प्रमुख मागण्यांसाठी आज जिल्हाधिकारी कार्यालयासमोर लक्ष्यवेधी आंदोलन करण्यात आले.

हे आंदोलन सामाजिक कार्यकर्ते



तथा बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाचे मुख्य प्रचार प्रमुख डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांच्या नेतृत्वाखाली पार पडले. यावेळी जिल्हाधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्री तथा गृहमंत्री, पोलीस महासंचालक आणि विशेष पोलीस महानिरीक्षक (संभाजीनगर परिक्षेत्र) यांना निवेदन देण्यात आले. या आंदोलनात माहिती अधिकार कार्यकर्ते शेख युनुस चऱ्हाटकर, मुबीन शेख, शिवशक्ती-भीमशक्ती विचारमंचाचे प्रदेशाध्यक्ष बाळासाहेब मोरे, माजी सैनिक अशोक येडे (जिल्हाध्यक्ष, आम आदमी पार्टी बीड) रामधन जमाले (जिल्हाध्यक्ष, इंटक बीड), किष्किंधा पांचाळ (अध्यक्ष, विश्व कल्याण महिला सेवा भावी संस्था, बीड) , सामाजिक कार्यकर्ते बाजीराव ढाकणे , भिमराव कुटे आदी उपस्थित होते. राज्यात अनेक ठिकाणी ◀◀ पान ३ वर

# श्री क्षेत्र नारायणगड व श्री क्षेत्र भगवान गडाच्या नारळी सप्ताहाच्या सांगतेस आ. धनंजय मुंडे राहणार उपस्थित

**परळी वैद्यनाथ । प्रतिनिधी**

श्री क्षेत्र नारायण गड व श्रीक्षेत्र भगवानगड या दोन्हीही आध्यात्मिक गडांच्या नारळी सप्ताहाची आज (ता. ०७) एकाच दिवशी सांगता होणार असून या दोन्ही सप्ताहांना माजी मंत्री तथा आमदार धनंजय मुंडे हे उपस्थित राहणार आहेत.

श्री क्षेत्र नारायण गडाचा पारंपरिक नारळी सप्ताह हा गेवराई तालुक्यातील उमापूर येथे संपन्न होत असून धनंजय मुंडे हे आधी उमापूर येथील या सप्ताहास भेट देऊन श्रीनगर नारायण महाराजांचे व गडाचे महंत प्रेममूर्ती ह. भ. प. श्री शिवाजी महाराज यांचे दर्शन व आशीर्वाद घेतील.

श्रीक्षेत्र भगवानगडाचा पारंपारिक नारळी सप्ताह हा पाथर्डी तालुक्यातील बडेवाडी गावात संपन्न होत असून उमापूर नंतर धनंजय मुंडे हे बडेवाडी येथील सप्ताहात भेट देऊन ऐश्वर्या संपन्न संत भगवान बाबा व गडाचे महंत न्यायाचार्य ह. भ. प. डॉ. नामदेव महाराज शास्त्री यांचे दर्शन व आशीर्वाद घेतील. श्री क्षेत्र नारायण गड व श्रीक्षेत्र भगवानगड या दोन्ही गडांना अखंड हरिनाम फिरत्या नारळी सप्ताहाची अनेक वर्षांची परंपरा असून माजी मंत्री धनंजय मुंडे हे मागील अनेक वर्षांपासून या दोन्ही सप्ताहाच्या सांगता समारंभात उपस्थित राहत आले आहेत. मागील वर्षी मुंबई येथून येताना हेलिकॉप्टर उड्डाणास वेळेवर परवानगी न मिळाल्याने ही परंपरा एकवेळा खंडित झाली मात्र यावर्षी पुन्हा धनंजय मुंडे हे दोन्ही नारळी सप्ताह स्थळी दर्शनासाठी येणार असून, या आध्यात्मिक व्यासपीठावरून ते बोलतील का? काय बोलतील? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# बीडच्या सारिका जाधव यांना पीएच.डी. पदवी प्रदान

बीड । प्रतिनिधी

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर येथून डॉ. सारिका विश्वंभर जाधव यांनी भूगोल विषयात पीएच.डी. पदवी संपादन केली आहे.



त्यांच्या प्रबंधाचा विषय ''बीड जिल्ह्यातील रस्ते वाहतूक जाळ्याचा भौगोलिक अभ्यास'' असा होता. त्यांनी आपला संशोधन प्रबंध डॉ. एच. जी. पिसाळ (संशोधन मार्गदर्शक), जनविकास महाविद्यालय, बन्सरोळा, ता. कैज, जि. बीड यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केला. विद्यापीठाने २० फेब्रुवारी २०२६ रोजी त्यांच्या पीएच.डी. पदवीस मान्यता दिली आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल त्यांचे सर्व स्तरांतून कौतुक होत असून कुटुंबीय, मित्रपरिवार व शैक्षणिक क्षेत्रातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. त्यांच्या पुढील शैक्षणिक व संशोधन कार्यासाठी शुभेच्छा व्यक्त करण्यात येत आहेत.

# पाटोद्यात काँग्रेसचे 'संघटन सृजन अभियान' उत्साहात पक्ष बळकटीकरणासाठी कार्यकर्त्यांचा निर्धार

पाटोदा । प्रतिनिधी

अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे आणि लोकसभा विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण देशात काँग्रेस पक्ष अधिक सक्षम करण्यासाठी ''संघटन सृजन अभियान'' राबवले जात आहे. याच अभियानाचा भाग म्हणून आज, ६ एप्रिल २०२६ रोजी, पाटोदा तालुका काँग्रेस कमिटीची महत्त्वपूर्ण बैठक संपन्न झाली.

दुपारी १ वाजता आयोजित करण्यात आलेल्या या बैठकीत



कार्यकर्त्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. बैठकीनंतर दिल्लीहून आलेल्या पक्ष प्रतिनिधी नीतू वर्मा मॅडम यांनी कार्यकर्त्यांशी थेट संवाद साधला. यावेळी त्यांनी संघटनेची आगामी रणनीती आणि बुथ पातळीवरील बांधणी यावर विशेष मार्गदर्शन केले.

या मान्यवरांची लाभली उपस्थिती:

हा कार्यक्रम माजी आमदार एम. एम. शेख, संघटन निरीक्षक सुरेंद्र गोडजकर आणि प्रदेश समन्वयक ◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा...नवे विचार...

पुणे विशेष

मंगळवार दि.०७ एप्रिल २०२६ । पान ७

# आदर्शगाव गावडेवाडी येथील भीषण आगीत शेतमजुराचा संसाराची राख; सहा लाखांचे नुकसान

**पुणे । प्रतिनिधी**

आंबेगाव तालुक्यातील आदर्शगाव गावडेवाडी येथील वनदेव वस्तीमध्ये सोमवारी (ता. ६) दुपारी लागलेल्या भीषण आगीत शेतमजूर राहुल सिताराम खंडागळे यांचा संसार अक्षरशः राख झाला. या आगीत सहा लाख रुपयांचे नुकसान झाले असून कुटुंबीय बेघर झाले आहेत.

श्री भैरवनाथ यात्रा उत्सवानिमित्त बैलगाडा शर्यती पाहण्यासाठी खंडागळे कुटुंबीय गावात गेले होते. त्यामुळे घरात कोणीही नसताना अचानक झोपडीला आग लागली. घटनेची माहिती मिळताच ग्रामस्थ मदतीसाठी धावून आले; मात्र कडक ऊन आणि वाऱ्यामुळे अवघ्या दहा मिनिटांत संपूर्ण झोपडी जळून खाक झाली. या आगीत झोपडीसह लहान-मोठ्या १२ शेळ्या, धान्यसाठा, तांदूळ, भुईमुगाच्या शेंगांची पोती, शेती फवारणी पंप, शालेय पुस्तके,



संसारोपयोगी वस्तू तसेच ६० हजार रुपयांची रोख रक्कम जळून नष्ट झाली. यात्रा व कौटुंबिक कारणासाठी बँकेतून काढून आणलेली ही रक्कमही आगीत भस्मसात झाली.

घटनेनंतर कुटुंबीय घटनास्थळी आल्यानंतर महिलांसह लहान मुलांना रडू कोसळले. या दुर्घटनेमुळे गावात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. दरम्यान, ग्रामस्थांनी तत्काळ पुढाकार घेत अर्ध्या तासात ४५ हजार रुपयांची मदत उभी केली. नुकसानीचा पंचनामा अवसरी बुद्रुक येथील ग्राममहसूल अधिकारी रवींद्र बेंद्रे यांनी केला आहे. तसेच खंडागळे कुटुंबाला शासनाकडून तातडीने आर्थिक मदत मिळावी, अशी मागणी ग्रामस्थांनी तहसीलदार डॉ. सचिन वाघ यांच्याकडे केली आहे. गेल्या ४० वर्षांपासून राहुल खंडागळे यांचे वास्तव्य गावडेवाडी येथे आहे. खेड तालुक्यातील जऊळके या मूळ गावी घरकुलाचे काम सुरू असून त्यासाठी साहित्य खरेदीसाठी त्यांनी बँकेतून ६० हजार रुपये काढले होते. मात्र, ही संपूर्ण रक्कम आगीत जळून गेल्याने कुटुंब आर्थिक अडचणीत सापडले आहे.

# मावळ बाजार समितीत राष्ट्रवादीला धक्का; भाजपचा सभापती

**वडगाव मावळ । प्रतिनिधी**




मावळ तालुका कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभापती, उपसभापती पदासाठी नुकत्याच झालेल्या निवडणुकीत राष्ट्रवादीची सहा मते फुटली आणि राष्ट्रवादीची एकहाती सत्ता असताना भाजपचे सुभाषराव जाधव हे सभापती झाले. यामुळे मावळात सगळीकडे बोलबाला असलेल्या राष्ट्रवादीवर नामुष्कीची वेळ आली असून हा पराभव गांभीर्याने घेत आमदार सुनील शेळके यांनी थेट पक्षाच्या संचालकांना राजीनामे देण्याचे आदेश दिले असून राजीनामे न दिल्यास पक्षातून हकालपट्टी करणार असून पुन्हा या सर्वांसाठी माझे दरवाजे बंद असा सणसणीत इशारा दिल्याने चांगलीच खळबळ उडाली आहे.

मावळ तालुका कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये १८ जागांपैकी राष्ट्रवादी काँग्रेसचे १२ व काँग्रेसचा (आय) १ असे १३ चे स्पष्ट बहुमत असून भाजपचे अवघे ५ सदस्य आहेत. असे असताना नुकत्याच झालेल्या बाजार समितीच्या सभापती व उपसभापती पदाच्या निवडणुकीत भाजपचे उमेदवार सुभाषराव जाधव यांना ११ मते मिळाली तर राष्ट्रवादीचे उमेदवार विक्रम कलावडे यांना ५ मते मिळाली. त्यामुळे राष्ट्रवादीची ६ मते फुटल्याने उघड झाले.

एकीकडे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत एकहाती सत्ता मिळवणाऱ्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला पक्षातीलच फुटीरांमुळे पराभव पत्करावा लागला. त्यामुळे राष्ट्रवादीवर नामुष्कीची वेळ आली असून या पार्श्वभूमीवर आमदार सुनील शेळके, जिल्हाध्यक्ष विठ्ठलराव शिंदे, तालुकाध्यक्ष गणेश खांडगे यांनी बाजार समितीच्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या सदस्यांची तातडीची बैठक घेऊन सर्व सदस्यांनी सोमवारी राजीनामे द्यावेत असा आदेश दिला व राजीनामे न दिल्यास हकालपट्टी करण्याचा इशाराही दिला आहे.

# बाणेर येथील पासपोर्ट सेवा केंद्रात ११ एप्रिल रोजी विशेष मोहीम: 'सामान्य' आणि 'तत्काळ'साठी अर्ज करता येणार!

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे येथील बाणेर भागातील पासपोर्ट कार्यालयात ११ एप्रिल रोजी 'सामान्य' आणि 'तत्काळ' अर्जदारांसाठी विशेष पासपोर्ट मोहीम आयोजित करण्यात आली आहे. ही मोहीम परराष्ट्र मंत्रालयाच्या पुढाकाराचा एक भाग आहे. ज्यामध्ये पासपोर्ट भेटी लवकर उपलब्ध करून देणे आणि तातडीच्या प्रवासाची गरज असलेल्या नागरिकांना पासपोर्ट सेवा अधिक चांगल्या प्रकारे पुरवणे हा उद्देश आहे.

-ही मोहीम शनिवारी (दि. ११) बाणेरमधील पासपोर्ट सेवा केंद्रामध्ये राबवली जाईल. 'सामान्य' पासपोर्ट श्रेणीसाठी, अर्जदारांनी पासपोर्ट नियमांनुसार विहित केलेली सर्व कागदपत्रे पूर्ण आणि अचूक स्वरूपात सादर करावीत. अर्जदारांनी 'पासपोर्ट इंडिया ' या संकेतस्थळावरील सूचना काळजीपूर्वक वाचाव्यात. भेटीच्या दिवशी होणारी गैरसोय टाळावी. अनेक अर्जदार यांपैकी एका किंवा दोन्ही निकषांची पूर्तता करण्यात अपयशी ठरतात. त्यामुळे 'तत्काळ सल्ला' आणि 'तत्काळ हमीपत्र' काळजीपूर्वक वाचावे.

# पुरंदर विमानतळासाठी वनजमिनीच्या मंजुरीचा प्रस्ताव सादर!

**पुरंदर । प्रतिनिधी**

पुरंदर तालुक्यात प्रस्तावित छत्रपती संभाजीराजे आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पासाठी आवश्यक असलेल्या वनजमिनीच्या मंजुरीसाठी हालचालींना वेग आला आहे. एकूण १२८५ हेक्टर जमीन संपादनाच्या प्रक्रियेत असताना, त्यापैकी ३८.५० हेक्टर वन विभागाच्या जमिनीच्या वापरासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने (एमआयडीसी) वन विभागाकडे फॉरेस्ट क्लिअरन्ससाठी प्रस्ताव सादर केला आहे.



या विमानतळासाठी पुरंदर तालुक्यातील सात गावांमधील सुमारे ३२०० शेतकऱ्यांनी तीन हजार एकर जमीन देण्यास संमती दर्शविली आहे. या जमिनीच्या मोबदल्यासाठी राज्य सरकारने सुमारे सहा हजार कोटी रुपयांचे कर्ज कगऊउज या वित्तीय संस्थेकडून घेण्यास मंजुरी दिली आहे. मात्र, या निधीची प्रत्यक्ष उपलब्धता अद्याप झालेली नसून, जिल्हा प्रशासन निधीच्या प्रतीक्षेत आहे. निधी प्राप्त होताच तो थेट शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे.दरम्यान, निधी उपलब्ध होण्यापूर्वीच जमीन संपादन प्रक्रियेला गती देण्याचे प्रयत्न सुरू आहेत. त्यामुळे एकीकडे आर्थिक तरतूद आणि दुसरीकडे प्रशासकीय प्रक्रिया अशा दोन्ही पातळ्यांवर हालचाली सुरू असल्याचे दिसून येते.

प्रकल्पासाठी आवश्यक असलेल्या १२८५ हेक्टर क्षेत्रापैकी ३८.५० हेक्टर जमीन ही वन विभागाच्या मालकीची असून, या गवताळ क्षेत्राच्या रूपांतरणासाठी केंद्रीय पोर्टलवर प्रस्ताव अपलोड करण्यात आला आहे. वनजमिनीचा वापर बदलण्यासाठी पर्यावरणीय आणि वन विभागाच्या मंजुरीची आवश्यकता असल्याने ही प्रक्रिया अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे. सध्या हा प्रकल्प प्राथमिक टप्प्यात असून, वन विभागाकडून प्रस्तावासंदर्भात काही अतिरिक्त कागदपत्रांची मागणी करण्यात आली आहे. ही पूर्तता झाल्यानंतर प्रस्ताव पुढील मंजुरीसाठी नागपूर येथील वन विभागाकडे पाठविण्यात येणार आहे. अंतिम पर्यावरणीय आणि वन मंजुरी मिळाल्यानंतरच प्रत्यक्ष बांधकामास सुरुवात होईल, अशी शक्यता प्रशासनाकडून व्यक्त करण्यात येत आहे

# राज्य वकिल परिषदेच्या मतमोजणीला ब्रेक; उमेद्वारांनी आक्षेप घेतल्यानंतर मतमोजणी थांबविली

**पुणे । प्रतिनिधी**

महाराष्ट्र आणि गोवा राज्य परिषदेच्या मतमोजणीदरम्यान उमेद्वार प्रतिनीधींनी आक्षेप घेतल्याने पहिल्याच दिवशी मतमोजणी थांबविण्यात आली.



मतपत्रिकेत मतदान दाखविण्याच्या मागणीसह मतांच्या नोंदीसाठी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या नेमणुकीला यावेळी आक्षेप घेण्यात आला. त्यामुळे, वीस मतपत्रिकांच्या मोजणीनंतर उमेद्वारांनी अर्ज सादर केल्याने नोंदणी थांबविण्यात आल्याची माहिती ड. राणी कांबळे-सोनावणे यांनी दिली. वकिलांची शिखर संघटना असलेल्या राज्य वकिल परिषदेसाठी मतदान प्रक्रिया नुकतीच पार पडली. त्याची मतमोजणी मुंबई उच्च न्यायालयातील परिषदेचे कार्यालय आणि बॉम्बे लॉयर्स सोसायटी येथे होत आहे. त्याची सुरवात सोमवारी सकाळी दहा वाजता परभणी जिल्ह्यापासून सुरवात करण्यात आली. वीस मतांची मोजणी होताच उमेद्वार प्रतिनिधींनी आक्षेप नोंदवित निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे अर्ज करण्यात आला. त्यामुळे, मतमोजणीची प्रक्रिया होणार की मतमोजणी लांबणीवर पडणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# अमली पदार्थांचे विक्रेते, पुरवठादार व सेवन करणारे पोलिसांच्या रडारवर; पोलिस आयुक्तांनी घेतली झाडाझडती

**पुणे । प्रतिनिधी**

अल्पवयीन मुलीच्या अपहरणाचा तपास करत असताना पकडलेल्या आरोपींच्या चौकशीत अमली पदार्थांचे जाळे उघड झाले होते. यातून अमली पदार्थांचे सेवन करणाऱ्या २१ जणांची सोमवारी पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांनी चौकशी केली.



या गुन्ह्यात उत्तमनगर पोलिसांनी सुनील गोपाळ राठोड उर्फ राठ्या राठोड (वय २८), राजन गोपाल नायर (वय ३७), जतिन जयवंत कदम (वय २६, रा. वारजे) व शुभम संतोष दहिभाते (वय २८, रा. कोंढवे धावडे) यांना अटक केली होती. त्यांच्या ताब्यातून मेफेड्रोन हा अमली पदार्थ जप्त करण्यात आला होता. तपासात सुनील राठोड याच्या मोबाइलमध्ये ३०० ते ३५० बँक व्यवहार समोर आले होते. त्यातील ७६ जणांची नावे पोलिसांनी समोर आणत त्यांचा शोध सुरू केला. त्यात अनेकजण अमली पदार्थ सेवन करणारे असल्याचे समोर आले होते. त्यातील २१ जणांची पोलिसांनी सोमवारी झाडाझडती घेतली. पोलिसांकडून आता यांच्याकडे कसून चौकशी सुरू केली असून, हे आणखी कोणाकडून अमली पदार्थ घेतात का किंवा घेतले आहेत का?, याचा तपास सुरू आहे. पोलिसांच्या कारवाईत एका माजी उपसरपंचाची देखील चौकशी करण्यात आली.

आपण मित्रांसोबत समारंभाला गेला होता. काही मित्रांमुळे मी अमली पदार्थ घेतले आणि त्यांच्या मोबाइलमधून पैसे दिले, असे त्याने कारवाई दरम्यान सांगितले होते. मात्र, तपासणीवेळी माजी उपसरपंचाने आपण, असे काही करत नसल्याचेही स्पष्ट केले. पोलिसांनी चौकशी केलेल्या २१ पैकी तिघांनी वेगवेगळ्या कारणांसाठी राठ्या राठोड यांना पैसे दिले होते. त्यांचा या अमली पदार्थ प्रकरणाशी संबंध नसल्याचे तपासात स्पष्ट झाले आहे. मात्र, ज्यांच्या यात सहभाग आहे त्यांच्या कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. या प्रकरणातील सर्वांचे आता पोलिसांकडून समुपदेशनही केले जाणार असून, अमली पदार्थांची सवय सोडण्यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत.



# पाताळेश्वर लेणीत 'हेरिटेज वॉक'चे आयोजन

**पुणे । प्रतिनिधी**

पुरातत्त्व सर्वेक्षण ( एएसआय ) मुंबई सर्कलच्या वतीने पुण्यातील ऐतिहासिक पाताळेश्वर लेणीत मंगळवारी (दि.७) सायंकाळी ५.३० वाजता 'डिजिटल हेरिटेज वॉक' या विशेष उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमाद्वारे नागरिक, विद्यार्थी व इतिहासप्रेमींना भारताच्या समृद्ध पुरातत्त्व वारशाची माहिती आधुनिक डिजिटल माध्यमातून देण्याचा उद्देश आहे.

या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून दक्षिण विभागाचे प्रादेशिक संचालक डॉ. नवरत्न कुमार पाठक उपस्थित राहणार आहेत. तसेच या उपक्रमाचे संयोजन अधीक्षक पुरातत्त्वज्ञ डॉ. अभिजित एस. आंबेकर यांनी केले आहे. 'डिजिटल हेरिटेज वॉक'च्या माध्यमातून पाताळेश्वर लेणीचा इतिहास, स्थापत्य वैशिष्ट्ये, सांस्कृतिक महत्त्व आणि संरक्षणाचे उपाय यांची सविस्तर माहिती मार्गदर्शकांच्या सहाय्याने देण्यात येणार आहे. यामध्ये डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर करून वारशाचे सादरीकरण करण्यात येणार असल्याने विद्यार्थ्यांसाठी व अभ्यासकांसाठी हा उपक्रम उपयुक्त ठरणार आहे. हा कार्यक्रम सर्व नागरिकांसाठी खुला असून, पुणे शहरातील ऐतिहासिक वारशाबद्दल जागरूकता निर्माण करणे व त्याचे जतन करण्याबाबत जनसहभाग

# पुणे-बारामती प्रवास आता हायटेक! 'राजमाता जिजाऊ' शटल सेवेसाठी २५० नवीन बसची मागणी

**पुणे । प्रतिनिधी**

एसटीच्या पुणे विभागात पुणे- बारामती मार्गावर राजमाता जिजाऊ शटल बससेवेचा शुभारंभ झाला आहे. या सेवेचा विस्तार करण्यासाठी पुणे एसटी विभागाकडून राज्य परिवहन महामंडळाकडे २५० बसची मागणी करण्यात आली आहे. त्यामुळे विभागात अन्य मार्गांवरही शटल बससेवा सुरू करण्याचा मानस असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले. अत्याधुनिक सुविधांनी सज्ज राजमाता जिजाऊ बससेवेचा शुभारंभ राज्यपातळीवर नुकताच पार पडला असून,

येत्या काही महिन्यात राज्यभरात टप्प्याटप्प्याने सुमारे तीन हजार बसेस प्रवाशांच्या सेवेत दाखल होणार आहेत. त्यामध्ये पुणे एसटी विभागालाही काही गाड्या देण्यात येणार आहे. दरम्यान, मागील आठवड्यात पुणे विभागात राजमाता जिजाऊ शटल सेवेची सुरुवात झाली असून, बसला प्रवाशांकडून चांगला प्रतिसाद मिळत आहे. राजमाता जिजाऊ बस महिला




प्रवाशांच्या सुरक्षेला प्राधान्य देऊन तयार करण्यात आली आहे. त्यामध्ये ५६ प्रवासी आसन क्षमता असून, सुरक्षेच्या दृष्टीने पाच सीसीटीव्ही कॅमेरे, जीपीएस ट्रॅकिंग प्रणाली, पॅनिक बटण सुविधा, पब्लिक अनाउन्समेंट सिस्टम आणि इलेक्ट्रॉनिक मार्ग फलक अशा अत्याधुनिक सुविधा आहेत. त्यामुळे नोकरदार महिला, विद्यार्थिनी, तसेच दैनंदिन प्रवाशांसाठी ही सेवा अधिक उपयुक्त ठरणार आहे. यामुळे सकाळी आणि सायंकाळी पीक अवर्समध्ये कामानिमित्त शहरात ये- जा करणाऱ्यांची मोठी सोय होणार आहे.

# समाविष्ट गावांसाठी बांधकाम परवानग्यांना ६० दिवसांची मर्यादा; नगरविकास विभागाचे आदेश

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून (पीएमआरडीए) महापालिकेकडे आलेल्या समाविष्ट गावांतील बांधकाम परवानगी प्रस्तावांवर ६० दिवसांच्या आत निर्णय घेण्याचे स्पष्ट आदेश नगरविकास विभागाने दिले आहेत. राज्य शासनाच्या अधिसूचनेच्या तारखेपासून हा कालावधी मोजला जाणार असल्याचेही निर्देश देण्यात आले आहेत. या निर्णयामुळे अनेक दिवसांपासून रखडलेल्या बांधकाम परवानग्यांना आता गती मिळण्याची शक्यता आहे.



महापालिकेत समाविष्ट झालेल्या २३ गावांमधील बांधकाम परवानगीचे अधिकार पूर्वी पीएमआरडीएकडे होते. मात्र, गेल्यावर्षी तत्कालीन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी हे अधिकार महापालिकेकडे देण्याचे निर्देश दिले होते. त्यानंतर नगरविकास विभागाने ११ फेब्रुवारी रोजी अधिसूचना काढून परवानगीचे अधिकार महापालिकेकडे हस्तांतरित केले. जवळपास दोन महिने उलटूनही पीएमआरडीएकडून संबंधित कागदपत्रे आणि नोंदी महापालिकेला देण्यात आलेल्या नाहीत. त्यामुळे महापालिकेला प्रस्तावांवर कोणतीही कार्यवाही करता आलेली नाही. परिणामी, बांधकाम परवानग्या आणि टीडीआर वापरासंदर्भातील अनेक प्रस्ताव प्रलंबितच राहिले आहेत. या पार्श्वभूमीवर नगरविकास विभागाने स्पष्ट निर्देश दिले आहेत. संबंधित क्षेत्र ज्या प्राधिकरणाकडे होते, त्यांनी सर्व विकास परवानगी प्रस्तावांवर ६० दिवसांच्या आत मंजुरी किंवा नामंजुरीचा निर्णय घेणे बंधनकारक असल्याचे सांगितले आहे. या मुदतीत निर्णय न झाल्यास, ते प्रस्ताव नव्याने नियुक्त प्राधिकरणाकडे वर्ग करून त्यावर पुढील कार्यवाही करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. या आदेशानुसार आता पीएमआरडीएने तातडीने कारवाई करणे अपेक्षित असल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे.

# बोरघाटातील आडोशी बोगद्याचे मजबुतीकरण सुरु होणार

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे-मुंबई द्रुतगती मार्गावर बोरघाटातील आडोशी बोगद्याचे सर्वेक्षण पूर्ण झाले असून, मुंबईतील इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (आयआयटी- पवई) मधील तज्ज्ञांच्या मार्गदर्शनानुसार त्याच्या मजबुतीकरणाला सुरुवात केली जाणार आहे.



गेल्या १८ मार्च रोजी या बोगद्यातील छताचा बराच मोठा खडकाळ भाग कोसळल्याने काही वाहनांचे मोठे नुकसान झाले होते. बोगद्यातील दगड व मातीचा राडा-रोडा बाजूला करून काही तासांतच वाहतूक पूर्ववत करण्यात आली. मात्र, दगड कोसळलेला भागातील मुंबईकडे जाणारी एक मार्गिका (लेन) बॅरिकेड्स लावून वाहतुकीसाठी बंद ठेवण्यात आली आहे.

महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या (एमएसआरडीसी) तज्ज्ञांनी या बोगद्याचे सर्वेक्षण पूर्ण केले असून, त्याचा अहवाल आयआयटी पवईकडे पाठविला आहे. त्यांच्याकडून सूचना मिळताच पुढील आठवड्यापासून बोगद्याचे मजबुतीकरणाचे काम हाती घेण्यात येणार आहे.पुणे-मुंबई द्रुतगती मार्गावर आडोशी येथे मुंबईकडे जाणाऱ्या मार्गिकेवर हा बोगदा आहे. तर, पुण्याकडे येणारी वाहने या बोगद्यालगतच्या मार्गिकांचा वापर करतात. या बोगद्याच्या सुमारे शंभर ते सव्वाशे मीटर अंतरावर उजव्या बाजूच्या छताचा सुमारे २० ते २५ फूट लांब आणि सुमारे १० फूट रुंद भागातील खडक व माती गेल्या १८ मार्चला खाली कोसळली. घाटात दरडी कोसळण्याचे प्रकार तसे नेहमीच घडत असतात. परंतु, बोगद्यातील छताचा एवढा मोठा भाग ढासळण्याचा प्रकार प्रथमच घडला असून, ही मोठी चिंतेची बाब आहे. त्यामुळे या मार्गावरील सर्वच बोगद्यांचे स्ट्रक्चरल इंजिनिअरिंग आणि जिओटेक्निकल क्षेत्रातील तज्ज्ञांच्या मदतीने सुरक्षा ऑडिट करावे, अशी मागणी जाणकारांकडून केली जात आहे.